मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ११८ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ जून २०१९

Website : www.marathepratishthan.org (फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा सस्नेह नमस्कार.***

माझ्या संपादकीयत्वाखाली मराठे प्रतिष्ठानचा ‘हितगुज’चा हा पन्नासावा अंक प्रकाशित होत आहे. याचा मला फार आनंद वाटत आहे. सन २००६ साली हितगुजचा ६८ वा अंक पहिल्यांदा मी संपादित केला. २५ डिसेंबर पुण्याला वर्धापन दिन होता. त्याच कार्यक्रमात ‘हितगुज’चा हा अंक प्रकाशित करण्याचा गोड योग योगायोगाने जुळून आला. कै. लक्ष्मणरावांनी हितगुजमध्ये, ‘हितगुजची ही नॉनस्टॉप वाटचाल पुढे कोण चालविणार?’ असे आवाहन वेळोवेळी केले होते. परंतु कोणीही या आवाहनाला प्रतिसाद दिला नाही. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारिणीतील धुरिणांनी भीष्म पितामह कै. भाऊसाहेब मराठे, कै. वि.के. मराठे, भूतपूर्व अध्यक्ष कै. अरविंदराव मराठे, डोंबिवली, श्री. आनंदराव मराठे आणि कै. रमाकांत विद्वांस, सध्याचे विद्यमान अध्यक्ष सी.गो. खांबेटे, संस्थापक विश्वस्त श्री. वा. ग., सौ. नीलांबरीताई पुणे या सगळ्यांनी मी संपादक व्हावे म्हणून जोर लावून आग्रह धरला. सुलभाताई तर त्यात विशेष अग्रेसर आजही, ‘‘सुमेधाच हितगुजचं काम पाहील, तिला पर्याय नाही.’’ असं नेटाने सांगत असतात.

या मराठे प्रतिष्ठानच्या सहकार्यामुळे आणि आपल्या सर्व कपिगोत्री परिवाराच्या शुभेच्छांमुळे आणि शुभाशिर्वादांमुळे मी हितगुजचे ५० अंक काढू शकले हे नम्रतेने नमूद करते. ‘हितगुज’म्हणजे माझे लाडके, गुणी अपत्यच आहे म्हणा ना, मंडळी ‘हितगुज’चा विषय निघाला की आवडीने बोलत बसावेसे वाटते. ‘हितगुज’ विषयी सांगत राहावेसे वाटते नावच ‘हितगुज’ आहे. ना? तेव्हा आपल्या या हितगुजची वाटचाल थोडक्यात सांगते. सन १९८१ मध्ये साध्या वहीच्या आकाराचे आठ पानांचे हस्तलिखित परिवार समाचार पत्रिका म्हणून निघत असे. मराठे प्रतिष्ठानचे भीष्मपितामह कै. भाऊसाहेब मराठे आपल्या सुवाच्च्य अक्षरात लिहित असत. मराठे प्रतिष्ठानचे तेव्हाचे कृतीशील कार्यवाह कै. श्री. वि.के. मराठे यांनी ‘हितगुज’चे बारसे केले. ‘हितगुज’ या समर्पक नावाने १९८७ मध्ये छापील स्वरूपात अंक निघाला. चित्रकार राजाभाऊ मराठे यांनी हितगुजचा उत्कृष्ट लोगो तयार केला. इतकेच नाही तर हितगुजच्या ५०व्या आणि १००व्या अंकाचे मुखपृष्ठही त्यांनी छान रेखाटले. हितगुजचा ५०वा सुवर्णमहोत्सवी अंक जून २००२ मधे प्रकाशित झाला. ७५ वा अमृतमहोत्सवी अंक सप्टेंबर २००८ मधे तर १०० वा अंक डिसेंबर २०१४ला प्रकाशित झाला. आज ११८ वा अंक प्रकाशित होत आहे. मंडळी ‘हितगुज’चा हा प्रवास वाटतो तितका साधा, सरळ नाही, अनेक अडचणी आल्या. २००९ मधे तर हितगुज बंद करावा लागतो की काय अशी वेळ आली पण आपल्या सर्वांच्या सहकार्याने हितगुजला सुमारे सहा लाख निधी जमला आणि ‘हितगुज’ला जीवदान मिळाले. १००० रुपये देणगी वर्गणीत अंक काढणे परवडेना म्हणून २००० रुपये देणगी केली. आजही हितगुजला देणग्या, विज्ञापने मिळायला हवी आहेत. आमचे प्रयत्न कदाचित कमी पडत असतील पण ‘एक कर्तव्य’ म्हणून आपण हितगुजला भरघोस सहाय्य करावे. ‘हितगुज’ म्हणजे मराठे परिवाराची शोभा आहे.

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९ • इ-मेल : parbhakar.marathe@gmail.com
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

आपल्या कुलबांधव-भगिनींचे लेखन सृजनशील, चांगले भावपूर्ण अविष्कार प्रकट झालेले म्हणूनच सकस आणि सरस असे हितगुजमधे प्रकाशित होत असते. त्यामुळे हितगुजचे स्वरूप दर्जेदार झाले आहे. हितगुज दिवसेंदिवस वाचनीय होत आहे.

मंडळी माझ्या हातून परमेश्वरकृपेने हा ११८ वा (तो माझा पन्नासावा अंक) हितगुजचा अंक प्रकाशित होत आहे. तुम्हा सर्वांचे सहकार्य मला लाभले. प्रोत्साहन पाठिंबा मिळाला म्हणूनच हे शक्य झाले. आपण सर्व कुलबांधव घरचेच, घरच्यांचे आभार कसले मानायचे, आभार मानून मी परकेपणाची भावना मनात निर्माण करू इच्छित नाही. मंडळी सन २००६ पासून सलग २०१९ पर्यंत एक तपाचा काळ म्हणूया, एक संपादिका म्हणून तुम्ही मला सहन केलेत. माझ्यातील गुणदोषांसकट स्वीकारलेत, माझ्यावर लोभ ठेवलात यापुढेही ती होत राहील. हितगुजविषयी आपले अभिप्राय कळवित राहा. चांगल्या-वाईट प्रतिक्रिया व्यक्त करा म्हणजे काही सुधारणा करता येतील. माझ्यावर लोभ ठेवलात, म्हणून कृतज्ञता व्यक्त करते. कार्यकारिणीतील विश्वस्त, अध्यक्ष, सदस्य सर्व जण मला सहकार्य करीत असतात. म्हणून इथवर वाटचाल करता आली. महत्त्वाचे म्हणजे मराठे प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष श्री. श्रीनिवास मराठे हितगुजचे वितरण नियमितपणे करतात त्यामुळे तुम्हाला हितगुज वाचायला मिळतो. याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच. कार्यवाह श्री. हेमंत मराठे हितगुजमधून आत्मीयतेने आपल्याशी संवाद साधत असतात. आपण कुलबांधव भगिनी हितगुज आपले आहे या ममत्व भावनेतून लिहित असता. त्यामुळे मला समाधान वाटते आणि काम करायला उत्साह येतो.

हितगुज असेच सदासर्वदा, अखंडपणे अव्याहत चालू राहो, हितगुजची भरभराट होवो. हितगुजवर कुलबांधवांची कृपादृष्टी राहो. हितगुजच्या ५००व्या अंकाच्या प्रकाशनाचे स्वप्न पूर्ण होवो ही कुलदेवतेकडे प्रार्थना करते. आपल्या सर्वांना माझ्या शुभकामना.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. २७ मे २०१९)

हार्दिक अभिनंदन।

सांगली येथील निवृत्त अभियंता श्री. विठ्ठल म. मराठे यांची नात आणि श्री. विश्वेश व अश्विनी मराठे यांची कन्या **कु. मृदुला विश्वेश मराठे** ही महाराजा सयाजीराव विश्वविद्यालय बडोदे येथून एम. ए. म्युजियोलॉजी ही पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झाली. तिला ८१.४% गुण मिळाले. मराठे प्रतिष्ठानतर्फे तिचे हार्दिक अभिनंदन व तिच्या पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा.




**राष्ट्रपुरुषांचे विस्मरण, हे राष्ट्राचे मरण व त्यांचे स्मरण, हे राष्ट्राचे संजीवन याच धर्तीवर म्हणता येईल पूर्वजांचे व प्रेरणा देणाऱ्याचे विस्मरण हे कुटुंबाचे संजीवन.**

९ मे २०१९ रोजी झालेल्या माझ्या व्रतबंधानिमित्त पूर्वजांचे स्मरण बाळकृष्ण विश्वनाथ मराठे (पणजोबा), राधाबाई बाळकृष्ण मराठे (पणजी), वासुदेव नरसिंह ताहमनकर (आजोबा), कमल वासुदेव ताहमनकर (आत्याआजी), केशव रामचंद्र गोखले (पणजोबा), सुमन केशव गोखले (पणजी), अतुल सुभाष निरगुडे (आत्याचे यजमान), लक्ष्मीबाई सोहनी (प्रेरणास्थान), सुमित्राबाई सोहनी (प्रेरणास्थान) आज तुम्ही हवे होतात.

| | |
|---|---|
| पुस्तकाचे नाव | **वाचनाविषयी सर्वकाही** |
| लेखक | कालिदास बा. मराठे |
| प्रकाशन | **कजा कजा मरू प्रकाशन** |
| छापील किंमत | २००/- |

# संवाद कुलबांधवांसाठी

• श्री. हेमंत अरुण मराठे (पृ. २१), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९८२२८४७१२०/९२२०६९९५७

नमस्कार,
कुलबांधव व भगिनींनो.

आपल्या मार्चच्या संवादानंतर देशभरात दर पाच वर्षांनी येणाऱ्या लोकशाही च्या उत्सवाला सुरुवात झाली व दीड दोन महिने देशातील वातावरण ढवळून निघाले. सोशल मीडिया तर खूपच सजग झाला, यावेळच्या निवडणूकीत लोकांनी या माध्यमाचा पुरेपूर वापर करून घेतला. परंतु याचबरोबर या माध्यमातून लोकांनी ज्या पोस्ट टाकल्या त्यातून लोकांची मानसिकता कळून आली. किती वाईट भाषा वापरली जात होती या माध्यमावर, किळस वाटत होती. शिक्षणाचा खरंच काही उपयोग झाला आहे का याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली असताना कोणत्या प्रकारचे शिक्षण देणं आवश्यक आहे हेही ठरवावं लागणार आहे.

आपला हितगुज ग्रूप असो अथवा आणखीन कोणताही, लोकं आपली मतं बेधडकपणे मांडत होती. परिणामाची चिंता नव्हती, मात्र हीच लोकं जर एकमेकांसमोर आली तर तशीच बोलतील का? तर नक्कीच नाही हेच उत्तर येतं, कारण एकमेकांसमोर आल्यानंतर समोरच्याला काय वाटेल याचा विचार पहिल्या प्रथम मनात येतो. हीच परीस्थिती सध्या सगळ्या समाजाबरोबरीने आपल्याही समाजाची झाली आहे. आपण व्हॉटसअॅप,फेसबुकवर एकदम सक्रीय असतो, आपला हितगुज ग्रुपवर तर पोस्ट चा सडा पडतो परंतु यातील कितीजण व्यक्तीगत एकमेकांना ओळखतात? किंवा कितीजण समोरासमोर आल्यावर मनमोकळेपणाने बोलतात? तर उत्तर नकारार्थीच येईल, अपवाद नक्कीच आहेत. लोकं म्हणतात आम्हाला वेळ मिळत नाही, खरं आहे, पण मुख्य म्हणजे वेळ कधीच मिळत नसतो, तो काढावाच लागतो. लोकांचं एकमेकांकडे जाणंयेणं कमी झाले असून त्यामुळे महत्वाचे हे की पुढील पिढ्यांना ही नाती कळत नाहीत व त्याची गरजही वाटत नाही. परंतु हे योग्य नाही, एकमेकांकडे जातयेत राहिल्याने संपर्क वाढतो, नाती जुळतात, बिघडलेली नातीदेखील पुन्हा जुळतात व त्यामुळे मन प्रसन्न होतं. महत्वाचं हे की सध्या सर्व घरांमध्ये जो मुलांच्या लग्नाचा प्रश्न सतावतोय तोही कमी होण्यास मदत होईल कारण एकमेकांना भेटल्याने स्थळांची माहिती देखील होत जाते. हा लग्नाचा विषय छेडण्याचं कारण म्हणजे माझ्या संपर्कात बरेच लोक येतात व त्यामधे सार्वत्रिक प्रश्न हाच आहे की मुलांची लग्न जमत नाहीत. यापुढे असं सांगितलं जातं की आपल्या समाजातील मुली इतर समाजातील मुलांशी लग्न करतात, तसेच त्यांना शहरच हवं असतं, घरामधे सासूसासरे वगैरे नको असतात इत्यादी. ही समस्या सार्वत्रिक झालेली जाणवते आहे. मी काही पालकांना म्हटलं कि असं जर आहे तर तुमच्या मुलांना सांगा ना तुम्ही देखील दुसऱ्या समाजातील मुली आणा लग्न करून, काय हरकत आहे? हे म्हणणं काहीजणांना पटतं पण बरेचजणांना पटत नाही. परंतु माझ्या मते निरोगी समाज निर्माण होण्यासाठी योग्य वयामध्ये मुलामुलींची लग्न होणं आवश्यक आहे.जरा वेगळा मुददा मांडला आहे, परंतु बऱ्याच जणांनी हा विषय माझ्याकडे चर्चिला असल्याने मी आपणासमोर हा विषय मांडला. आपली मते अवश्य कळवा.

मंडळी, आपल्या कुलवृत्तांताचं अद्ययावतीकरणाचं काम सुरू झाले असून १९९० नंतरच्या पुढील पिढ्यांची माहिती आपण स्वतः लवकरच आपल्या वेबसाइटवर जाऊन भरू शकाल, योग्य वेळी आपणास कळवलं जाईल तेव्हा प्रत्येकाने आवर्जून आपल्या पुढील पिढ्यांची माहिती अपलोड करा, यामुळे खूप फायदा होणार आहे.

आपल्या कुळातील विद्यार्थी, विद्यार्थीनींचे निकाल आता पुढील काही दिवसांपासून कळू लागतील, तेव्हा सदर निकाल आम्हाला जरूर कळवा, योग्य ती प्रसिध्दी दिली जाईल, शिवाय जे गुणवत्ता पारीतोषिकासाठी पात्र असतील त्यांनी योग्य त्या नमुन्यांमध्ये अर्ज गुणपत्रिकेसह वेळेत आमच्याकडे पाठवावेत.

आपण प्रतिष्ठानतर्फे शैक्षणिक मदतही देतो, जर कोणी आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थी असेल तर जरूर अर्ज करावा, शक्य तेवढी मदत दिली जाईल. आपल्या ओळखीमधील कोणी आपल्या परिवारातील गरजू आर्थिक मदतीसाठी अर्ज करू इच्छित असेल तर त्याना मार्गदर्शन करा.

आपल्या प्रतिष्ठान च्या कार्यकारिणी मंडळाची मुदत यावर्षी संपत असल्याने येत्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये निवडणूक होणार असून नवीन कार्यकारिणी अस्तित्वात येईल. आपल्या पैकी ज्या सभासदांना स्वखुशीने प्रतिष्ठानाशी जोडलं जाण्याची इच्छा असेल, कार्यकारिणी मंडळामध्ये काम करायचं असेल अशांनी लवकरात लवकर आपली नावे कळवावीत. संस्था मजबूत होण्यासाठी नवनवीन लोकांनी येणं आवश्यक आहे.

आता आपली रजा घेतो, आपली भेट पुढील अंकामध्ये, धन्यवाद.

♦

### आधुनिक संत - भक्त मुकुटमणी
# गुरुवर्य - सोनोपंत दांडेकर

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९



**आ**युष्यात काही गोष्टींची मनाला फार मोठी रूखरूख लागून राहाते, त्या गोष्टी मिळाल्या नाहीत तर मन खंतावते, उदास होते. माझ्याही मनाला अशीच कायमची फार मोठी चुटपूट लागून राहिली आहे ती म्हणजे, हातात टाळ आणि गळ्यात वीणा घेऊन संतशिरोमणी नामदेव महाराजांसारखे तासन्तास तल्लीनतेने ईश्वराचे भजन आणि कीर्तन करणारे वैकुंठवासी, गुरुवर्य सोनोपंत ऊर्फ मामासाहेब दांडेकर यांच्या कीर्तनश्रवणाचा लाभ मला मिळाला नाही. गतजन्मीची पुण्याई कमी पडली की काय न कळे, पण त्यांचे भक्तीरसात तुडूंब भिजलेले कीर्तन ऐकण्याचे भाग्य माझ्या नशिबी नव्हते हेच खरे. असो.

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर वैकुंठवासी होऊन आज ५० वर्षे झाली. त्या निमित्ताने त्यांच्या पवित्र स्मृतीला वाक्‌पुष्प अर्पण करण्याचा अपूर्व आणि गोड योग मला 'हितगुज'मुळे लाभला, ही माझ्या दृष्टीने परम आनंदाची गोष्ट आहे.

सोनोपंत दांडेकरांचा जन्म २०-४-१८९६ साली झाला. दांडेकर हे ठाणे जिल्ह्यातील केळवे – माहीम – पालघरचे होते. त्यांच्या वडिलांचे नाव वामन आणि आईचे नाव लक्ष्मीबाई. हे दोघे धार्मिक, दानशूर, नैतिक जबाबदारीचे पालन करणारे होते. ह्या माता-पित्यांना विष्णु व शंकर हे दोन पुत्र आणि चार कन्या होत्या. सोनोपंताना बालवयातच मातृवियोग घडला. त्यानंतर त्यांची थोरली बहीण जिजी ह्यांनीच त्यांना सांभाळले. घरात सर्वजण त्यांना 'सोनु' म्हणत.

### शिक्षण

सोनोपंतांनी १९०८ साली पालघर सोडले आणि जिजीबरोबर पुण्यास राहावयास आले. इंग्रजी शिक्षणाकरता नूतन मराठी विद्यालयातून ते १९१२ साली मॅट्रिक पास झाले. १९१७ साली ते बी.ए. झाले. त्यांना प्रल्हाद सीताराम स्कॉलरशिप मिळाली. ही स्कॉलरशिप मिळविणाऱ्या I.C.S. परीक्षेला बसण्याची परवानगी मिळत असे. त्यानंतर गुरुदेव रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली ते तत्त्वज्ञान हा विषय घेऊन एम्.ए. झाले. एम्.ए. झाल्यावर शिक्षण प्रसारक मंडळींचे आजीव सभासद होऊन न्यू-पूना कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून नोकरीस लागले. त्यापूर्वी संस्थेला 'मी वारकरी आहे. मला आषाढी एकादशीला पंढरीची वारी करण्यासाठी पंधरा दिवसांची रजा मिळाली पाहिजे.' – अशी अट घातली. संस्थेने ती कबूल केली.

त्यांच्या थोरली बहीण जिजीबरोबर रोज ते जोगमहाराजांकडे 'ज्ञानेश्वरी' ऐकायला जात. एका बाजूने देशाभिमान आणि दुसऱ्या बाजूने भक्तीमार्गाचे वातावरण तेथे असे. सोनोपंतांनाही भक्तीमार्गाची आणि देशसेवेची तळमळ लागली. 'चलेजाव'च्या चळवळीत त्यांनी सक्रीय भाग घेतला नसला तरी चळवळीतील कार्यकर्त्यांना त्यांनी मदत केली होती.

### वारकरी पंथाचे पुढारी

'सगुण चरित्रे परम पवित्रे हरिची वर्णावी' – या नाथांनी वर्णन केलेल्या अभंगाप्रमाणे सोनोपंतांनी कीर्तनमर्यादा पाळली. भक्ती ज्ञान विरहित गोष्टी त्यांनी कधी कीर्तनात केल्या नाहीत. भक्तीचा डांगोरा पिटून लोकसंग्रह केला. त्यांच्या कीर्तन – प्रवचनांमुळे समाजाचे जीवन उन्नत होत होते. कीर्तन प्रवचनांच्या द्वारे धर्मजागृती होत होती. ते व्यासंगी होते पण पांडित्याच्या मागे लागले नाहीत. त्यांनी आपला व्यासंग स्वतःच्या कार्यक्षेत्रापुरता मर्यादित ठेवला होता. वारकरी पंथाची प्रस्थानयत्री – गीता – भागवत – उपनिषदांचा त्यांचा अभ्यास गाढ होता.

*'जळे ते जाणीव, जळो रे नेणीव।*
*राहो माझा भाव। विठ्ठलपायी।'*

अशी त्यांची श्रद्धा होती. तुकारामांनी वर्णिल्याप्रमाणे 'न कळे दिवस कां राती। अखंड लागलीसे ज्योती' ही त्यांची भावावस्था होती. निस्पृहपणे, निःस्वार्थीपणे ते खऱ्या अर्थाने 'ज्ञानेश्वरी' जगणारे महापुरुष होते. सोनोपंत दांडेकर म्हणजे साधुत्वाचा आणि ब्रह्मचर्याचा आदर्श होय.

### ग्रंथसंपदा

'ज्ञानेश्वरीचे' त्यांनी केलेले संपादन, राजवाड्यांच्या ज्ञानेश्वरीनंतर, सोनोपंत दांडेकरांनी संपादित केलेली ज्ञानेश्वरी घरोघरी जाऊन पोहोचली. जोगमहाराज त्यांचे गुरु होत. त्यांचे चरित्र त्यांनी लिहिले. दांडेकर कुळवृत्तात, ज्ञानेश्वरीचा शब्दकोश, सार्थ तुकाराम गाथेचे संपादन, ईश्वरवाद, वारकरी पंथाचा इतिहास, ज्ञानेश्वर चरित्र आणि तत्त्वज्ञान, ईश्वरमीमांसा, ज्ञानदेव व प्लेटो, अभंग-संकीर्तन, इतर पुस्तकांना लिहिलेले पुरस्कार व प्रस्तावना, शोधनिबंध, हिंदी व इंग्रजीतूनही त्यांनी लेखन केले. 'प्रसाद' मासिकाचे ते संपादक होते. याप्रमाणे सोनोपंत दांडेकरांची ग्रंथसंपदा

विपुल आहे. या सर्व लेखनांतून भारतीय दर्शनाचा त्यांचा सूक्ष्म आणि सर्वस्पर्शी व्यासंग जाणवतो त्याचबरोबर ज्ञाननिष्ठेला श्रद्धा आणि भक्तीची जोड असलेली उत्कट भावनाशीलता जाणवते.

**मामासाहेबांचे निर्वाण**

९ जुलै १९६८ या दिवशी मामासाहेब वैकुंठवासी झाले. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी त्यांच्या अंत्ययात्रेचे केलेले वर्णन पाहाण्यासारखे आहे.

पुणे-आळंदी मार्ग लोकांनी गजबजून गेला. या यात्रेचे एक टोक पुण्यात तर दुसरे टोक आळंदीत होते. बुक्का, गुलाल, फुले यांनी वाट रंगली होती. पालखी परत निघाली, - वारकऱ्यांचा महापूर आळंदीच्या दिशेने वाहू लागला. जेथे मामांवर अग्निसंस्कार घडला, त्या स्थानी वारकऱ्यांनी अक्षरशः लोटांगण घातले. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यांतून मामांचे विद्यार्थी आळंदीला आले. डबडबलेल्या डोळ्यांनी त्यांना एकमेकांकडे पाहिले, मूकपणे स्मरण केले. त्या सर्वांना इंद्रायणीच्या तीरावर आणखी एक सोन्याचा पिंपळ दिसू लागला. सोन्याप्रमाणे त्यांनी आपले जीवन निष्कलंक व तेजस्वी ठेवले.

'नित्य नवा कीर्तनी कैसा ओढवला रंग। वक्ता आणि श्रोता झाला स्वयेचि पांडुरंग।' असा अनुभव कीर्तनांतून देणाऱ्या मामासाहेबांना प्रेम आदराने नमस्कार.

*यालागी आता। स्तुती सांडूनि निवांता।*
*चरणी ठेवीजे माथा। हेचि भले।।*

♦

# स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाने JNUत रोवला राष्ट्रभक्तीचा झेंडा, दुमदुमला भारतमाता की जय, वंदेमातरम्‌चा जयघोष

**स्वा**तंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक आणि अभाविप-JNU साठी १४ मार्च २०१९ हा दिवस ऐतिहासिक ठरला. या देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारे लाखो स्वर्गस्थ क्रांतिकारक आणि स्वातंत्र्य टिकवण्यासाठी हौतात्म्य पत्करलेले आपले जवान काल आनंदित झाले असतील. कारण ज्या JNUत 'भारत तेरे टुकडे होंगे'च्या घोषणा दिल्या गेल्या त्याच ठिकाणी उच्चरवाने गुंजल्या 'भारतमाता की जय' आणि 'वंदेमातरम्'च्या घोषणा. राष्ट्रभक्तीने फुलून गेलेल्या वातावरणात सादर झालं नाटक 'हे मृत्युंजय'. स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक आणि अनामिका निर्मित, दिग्पाल लांजेकर लिखित, दिग्दर्शित 'हे मृत्युंजय' या नाटकाच्या मराठीतील ५८ जोरदार प्रयोगानंतर सादर झालेला हा हिंदीतला दुसराच प्रयोग विशेष ठरला. तुडुंब भरलेल्या प्रेक्षागारात वाक्यावाक्याला मिळणाऱ्या टाळ्या, 'छत्रपती शिवाजी महाराज की जय, स्वातंत्र्यवीर सावरकर की जय, वंदेमातरम्'च्या घोषणांनी कलाकारांनाही वेगळी ऊर्जा मिळाली आणि नाटक अधिकच रंगत गेलं.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लाखो क्रांतिकारकांच्या त्यागाचा, बलिदानाचा इतिहास तरुण पिढीपर्यंत पोहोचवणं ही काळाची गरज आहे. जो देश आपला इतिहास विसरतो त्या देशाचा भूगोल बदलतो हे सावरकरांचं सांगणं खरं ठरलं. १९४७ मध्ये आपण स्वातंत्र्य मिळवलं पण आपल्या देशाचा भूगोल बदलला, देशाचे तुकडे झाले. आताही देशाचे तुकडेच नाही तर आपला देशच गिळंकृत करायला पाकिस्तान धडपडत असताना आजच्या या कन्हैयासारखे, कंसाचे वंशज स्वतःच्याच देशावर घाव घालत आहेत तेव्हा गरज आहे ती जातिवंत कन्हैयाची, कृष्णनीतीची. सावरकर स्मारकाचं कार्य मुंबईतल्या वास्तुपूरतं मर्यादित न ठेवता ते देशभर पोहोचवण्याच्या प्रयत्नाला आलेलं, JNU तला प्रयोग हे मोठं यश आहे. राजकीय लाभासाठी सावरकर हे नावच अनेक ठिकाणी त्याज्य मानलं जात असताना, JNU - ज्याला कम्युनिस्टांचा मदरसा समजलं जातं तिथे प्रयोग होतो आहे ही बातमीच अनेकांचा उत्साह वाढवणारी होती. शिकण्याच्या नावाखाली इथं वर्षानुवर्ष रहाणारी ही मंडळी, निवडणुकांच्या काळात गुजराथ, बिहारमध्ये गोंधळ घालण्यासाठी जातात. शैक्षणिक संस्थाचा वापर देशविघातक कृत्यांसाठी करणाऱ्या या मंडळींना चाप लावणं आवश्यक आहे. त्याची सुरुवात अभाविपनं केली आहेच. पण सावरकर स्मारकही त्यासाठी नेटानं उभं ठाकलं. नाटकाचा प्रयोग करायचं ठरल्यावर विरोधकांनी अनेक अडचणी निर्माण केल्याच पण त्याला अभाविपचे कार्यकर्ते पुरून उरले. JNUच्या इतिहासातला इतका प्रतिसाद मिळालेला हा पहिला कार्यक्रम ठरला. आम्ही हिंदू सोशिक आहोत, सहिष्णू आहोत पण जिथे देशाच्याच अस्तित्वाचाच प्रश्न असेल तिथे आम्ही एकदिलानं उभे राहतो हा संदेश विरोधकांपर्यंत या प्रयोगानं निश्चितच पोहोचला. जोरदार आवाज करणाऱ्यात ताकद नसते तर ती कृतीतून सिद्ध होते हे 'हे मृत्युंजय' प्रयोगानं दाखवून दिलं...



मंजिरी मराठे https://www.facebook.com/196423787387504/posts/812341572462386/

**- सौ. मंजिरी मराठे** (पृ.३९२)
कोषाध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारक, दादर

# सुटका

• सौ. साधना सुधाकर मराठे (पृ. ५७), महाड (जि. रायगड)

**मा**तृत्व सुतिकागृहाच्या बैठ्या इमारतीच्या पायऱ्या चढतांना निनाद मनांतून खूपच अस्वस्थ झाला होता. प्रत्येक पायरीवर क्षणभर थबकत थबकत त्याने सात ते आठ पायऱ्या पार करून तो लांबच लांब असलेल्या व्हराड्यांत उभा राहिला. नैनाला ठेवलेल्या स्पेशल खोलीत त्याला जायचा धीर होईना. पण जाणे तर भागच होते. आपल्याला पाहाताच नैनाची होणारी मनस्थिती आपण सहन करू शकणार नाही. ती नको नको म्हणत असतांना आपण ही चौथ्यांदा जीवघेणी आणि मानसिक खच्चीकरण करणारी वेळ तिच्यावर आणली होती. ह्याची त्याला मनोमन खंत वाटत होती.

दरवेळेला त्या मातृवेणा सोसतांना ती फार थकून जात असे. पण हाती काहीच लागत नव्हते. त्याला तीव्रतेने स्वतःची घृणा वाटली. नैनाला दवाखान्यात ॲडमिट केले तेव्हा तो आठ दिवसाच्या ऑफिस टुरवर गेला होता. नैनाचे दिवस पूर्णपणे भरत आले होते. परंतु घरी आई, बाबा, मोठी बहीण सारे असल्यामुळे तो निर्धास्तपणे गेला होता.

आज पहाटे तो घरी आला होता. घरांत शिरतांना आईचा दुःखी उदास चेहरा पाहताच एका क्षणांत सारे काही त्याला कळून चुकले होते. आई फक्त एवढेच म्हणाली, 'निनाद आता झालं हे खूप झाले. आता ह्यापुढे विषाची परीक्षा नको. असेल नशिबातच जर नसेल तर म्हणत तिने डोळ्याला पदर लावला.' निनादला गलबलून आले. तो कातर स्वरात म्हणाला, 'आई मी तुला वचन देतो यापुढे मी नैनावर मातृत्व लादणार नाही. पण मला कळत नाही हे असं का व्हावं.' त्यावर बाबा आत येत म्हणाले, 'दैव आपलं. त्या पोरीच्या समोर गेलं की तिचे सांत्वन कसे करावे हेच समजत नाही. शब्दच मुके होऊन जातात.' प्रवासाने तू ही थकला आहेस पण कालपासून ती तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. अंघोळ कर, चार घास खाऊन घे आणि तिला भेटायला जा.

सारे यांत्रिकपणे स्वतःचे आवरून निनाद बाहेर पडणार तोच आई म्हणाली, 'हा खिरीचा डबा घेऊन जा. काल रात्री पाठविलेला डबा भूकच नाही ह्या सबबीखाली परत आला आहे. काय करावे तेच कळत नाही. त्याच्या हातात डबा देत म्हणाली ही खीर तिला प्यायला दे. अरे ओली बाळंतीण आहे ती. पोटात काही नसून चालणार नाही. काल मी तिला हरप्रकारे सांगून पाहिलं पण शेवटी तिच्या हट्टापुढे माझी हार झाली.' बरं दे इकडे. मी बघतो प्रयत्न करून म्हणत त्याने स्कुटरला किक मारली व तो अधिरतेने दवाखान्यापर्यंत आला ही पण पायऱ्या चढतांना मात्र त्याचे अवसान गळून पडले.

संथ पावले टाकीत तो तिच्या खोलीपाशी आला. सताड डोळे उघडे ठेवून नैना वर गरगर फिरणाऱ्या पंख्याकडे पहात होती. तो आल्याची तिला चाहूलही लागली नाही. एवढी ती शरीराने व मनाने थकली होती. त्याने छोट्या कपाटावर डबा ठेवून हलकेच साद घातली. 'नैनाऽ नैना मी आलोय बघ. बघ ना इकडे.' त्यावर क्षीण आवाजात म्हणाली, 'कोण तुम्ही?' 'अग, असं काय करतेस. मी तुझा निनाद.' त्याच्या बोलण्यावर दीर्घ सुस्कारा सोडत त्याचा हात आपल्या हातात घेत म्हणाली, 'संपलं सारं. यावेळी तरी वाटलं होतं माझं सोनुलं माझ्या कुशीत असेल, पण पुन्हा मी एकटीच घरी जाणार' म्हणत डोळ्यातून वाहणारे अश्रू टॉवेलने हलकेच पुसत ती आतल्या आत स्फुंदत राहिली. निनादने तिच्या डोक्यावर हलकेच थोपटले गदगदलेल्या स्वरात म्हणाला, 'नैना मी तुला इथेच वचन देतो ह्यापुढे मी तुझ्यावर कधीही माझ्या हट्टाखातर मातृत्व लादणार नाही. यापुढे तुला कधीही सुतिकागृहाची पायरी चढावी लागणार नाही. हा माझा शब्द मी अखेरपर्यंत पाळीन. नैना आईने खीर दिली आहे घेतेस ना?' त्यावर ती क्षणी आवाजात म्हणाली, 'मला आग्रह करू नका. खरंच असं झाल्यापासून माझी भूकच मंदावली आहे. काही खावसं वाटत नाही. असं नुसतं डोळे मिटून पडून रहावसं वाटतं. आणि वाटतं इथेच ह्या कॉटवर आपण शेवटचा श्वास घ्यावा.'

'नैना, असं अभद्र नको ग बोलूस. तू मला हवी आहेस. मलाच नाही तर सर्वांनाच हवी आहेस. आई, बाबा, ताई तुझी घरी येण्याची वाट पहात आहेत. ही खीर मी तुला माझ्या हातानी पाजणार आहे. 'असं म्हणत त्याने डबा उघडून चमच्याने तो खीर ढवळत म्हणाला, 'नैना माझ्यासाठी तरी चार घोट घे. नाही म्हणू नकोस तोंड उघड.' 'खरंच नको हो मला.' हे बघ तू खीर खाल्लीच पाहिजेस नाहीतर मी पुन्हा कधीही तुला भेटायला येणार नाही. त्यावर भावना विवश होत त्याचा हात धरत म्हणाली, 'असं नका बोलू. द्या घेते मी खीर म्हणत तिने तोंड उघडले.' अलगदपणे तिच्या तोंडात त्याने चमच्याने खीर सोडली. तिच्याशी हळुवारपणे बोलत त्याने तिला डब्यातील खीर पाजत डबा रिकामा केला. मग घोटभर तिला पाणी पाजून त्याने तिला हाताचा आधार

देवून बसवली व टेबलाखाली असलेल्या भांड्यात खळखळ चुळ भरायला लावली. मग तिचे टॉवेलने अलगद तोंड पुसून तिला पुन्हा व्यवस्थित गादीवर झोपवले.

खीर पोटात जाताच तिलाही थोडेसे बरे वाटले. सुकलेले ओठ ओलसर झाल्याचे तिला जाणवले. तिला हलकेच थोपटत तो स्टूलावर बसून राहिला. बघता बघता ती झोपेच्या आधीन झाली.

तो तिच्यापासून अलगद उठून डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेला. त्याला आलेला पाहताच डॉक्टरांनी त्याचे या म्हणून स्वागत केले. मिस्टर निनाद काय म्हणतोय आमचा पेशंट. यावर तो गंभीर स्वरात म्हणाला, 'काय म्हणणार खूप उदास आणि दुःखी झाली आहे नैना.' त्यावर त्याचा हात हातात घेत डॉक्टर गंभीरपणाने म्हणाले, 'मिस्टर निनाद तुम्ही सुशिक्षित आहात तेव्हा एवढेच सांगतो पुन्हा ही वेळ येऊन देऊ नका. त्यांची डिलीव्हरी म्हणजे आम्हाला एक आव्हान ठरतं. आजपर्यंत चार वेळा आमची परीक्षा त्या वर बसलेल्याने पाहिली आहे. परंतु त्याच्याच कृपेमुळे व आमच्या वैद्यकीय प्रयत्नामुळे वाचवू शकलो. तेव्हा इथेच थांबावे हे उत्तम. डॉक्टर तुमचं म्हणणं मलाही पटतंय. तुम्हाला मी वचन देतोय या पुढे असं होणार नाही. बरं तिला डिस्चार्ज कधी द्याल. त्याप्रमाणे पुढील तयारी करायला. ओके. तुम्ही तिला रविवारी सकाळी म्हणजे अजून दोन दिवसांनी घेऊन जाऊ शकता. ठीक आहे मग निघू मी आता? म्हणत निनाद बाहेर पडला. पुन्हा एकदा नैनाच्या कॉटशी जावून त्याने डोकावून पाहिले. नैना अजूनही झोपलेलीच होती. तिचा निरोप घेण्यासाठी तिला उठविणे त्याला जीवावर आले. तिच्या खोलीत असलेल्या नर्सला त्याने तिच्याकडे लक्ष देण्यास सांगून तो बाहेर पडला.

तो दवाखान्याच्या पायऱ्या उतरत असतानाच त्याची आई त्याला भेटली. तिच्याशी जुजबी बोलून तो आईचा निरोप घेऊन रस्त्यावर आला. स्कूटरला किक मारून तो घराकडे निघाला. घराच्या पायऱ्या चढतांना पडवीत असलेल्या पिंजऱ्यातील पोपटाने कलकलाट करून त्याचे लक्ष वेधून घेतले. क्षणभर त्याने रागाने पिंजऱ्यावर हाताचा पंजा आपटला. काही क्षण पोपट भेदरल्यासारखा गप्प झाला. पण परत त्याने कलकलाट सुरू केला.

निनादने त्याच्याकडे दुर्लक्ष करत तो माजघरात आला. बाबा माजघरांत आरामखुर्चीत पडून पेपर वाचत होते. त्याला आलेला पाहताच त्याने निनादला अधिरपणे प्रश्न केला. 'निनाद कशी आहे पोरगी. चार दिवसापूर्वी तिला भेटून आलो होतो. त्यावर पुन्हा भेटायला जाण्याचा धीर होत नाही मला. शरीराने आणि मनाने खूप उध्वस्त झाली आहे रे ती. तिच्याकडे पाहिलं की भडभडून येतं. तुझी आई धीराची आहे म्हणून ती तिची समजूत काढू शकेल.'

'खरंय बाबा तुम्ही म्हणता ते. मलाही तिला समजवणे कठीण होणार आहे. ती पूर्वीसारखी होण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील. मनाने आणि शरिराने खूप खचली आहे. बाबा ह्या तिच्या अवस्थेला मीच कारणीभूत आहे.' निनाद असा शोक करू नको. अरे दैवात असेल तेच घडतं बरं. डॉक्टरांना भेटलास ना?

'हो भेटलो' मग काय म्हणाले. 'काय म्हणणार म्हणाले तिचं बाळंतपण हे आमच्या वैद्यकशास्त्राला आव्हान असते. तेव्हा कृपया असे पुन्हा होणार नाही ह्याची काळजी घ्या.' कपाळावर आलेला घाम पुसत बाबा म्हणाले, बरोबर आहे डॉक्टरांचं. अरे स्त्रीनेच ह्या यातना सोसाव्या, भोगाव्या, आपल्याला ते कधीच कळणार नाही. एक दीर्घ सुस्कारा सोडीत म्हणाले,

'बरं, कधी पाठवणार आहेत घरी.' रविवारी सकाळी घेऊन जा म्हणाले. ठीक आहे. पैशाची काही व्यवस्था झाली का? त्यावर निनाद खिन्नपणे म्हणाला बरीचशी झाली आहे. पण ३००/-रु. कमी पडताहेत.

असू दे असू दे, त्या पैशाची व्यवस्था मी करतो. मग तर झालं ना? जा घरात जावून हातपाय धुवुन घे. तोपर्यंत मीरा आपली जेवणाची पाने घेईल. 'मीरा, ए मीरा, अग निनाद आलाय. जेवणाची तयारी कर.' तेवढ्यात माजघराच्या उंबरठ्यात येत मीरा म्हणाली, 'बाबा जेवणाची तयारी ठेवते पण प्लीज तेवढे वाढून घ्या. मला शाळेत जायला उशीर होतो आहे. मी निघतेय आता १५ मिनीटात.' 'बरं बाळ जा हो. आम्ही घेऊ वाढून म्हणत ते स्वैपाकघरात आले. निनादही येवून खुर्चीवर बसला. जेवणे मुकाट्यानेच पार पडली.'

जेवण होताच बाबा वामकुक्षी घेण्यासाठी कॉटवर आडवे झाले. निनादने मागचे सगळे आवरून पडवीत आरामखुर्चीवर बसून पेपर वाचू लागला. वाचता वाचताच त्याला डुलकी लागली. आई घरी कधी आली ते त्याला कळलेही नाही.

आज नैनाला आणायचे म्हणून तो सकाळीच लवकर उठला. स्वतःचे सर्व आटपून तो बाहेर पडत असताना आई पण दारात येऊन उभी राहिली. 'अरे निनाद, थांब बाळा, मी पण येते तुझ्याबरोबर नैनाला आणायला.'

'अग आई तू कशाला येतेस. मी चटकन् रिक्षा करून जातो आणि तिला घेऊन येतो.' 'नको रे बाबा तिला काय वाटेल याचा विचार नको का करायला. आधीच ती मनाने हळवी झाली आहे. मी बरोबर असले की तिला आधार वाटेल.' बरं चल म्हणत दोघे रिक्षात बसली. रिक्षा दवाखान्यापाशी थांबताच दोघेही तिच्या खोलीत आली. ती तयार होवून वाट पहात होती. त्याने डॉक्टरांचे बिल पूर्ण करून तिच्या औषधाची यादी लिहून आणली. तिला हलकेच पायऱ्या उतरण्यास मदत करून दोघांनी तिला रिक्षात

बसवली व रिक्षा घराकडे निघाली. घरी येताच मीराने तिच्या अंगावरून तांदुळ आणि पाणी ओवाळून टाकले. तिच्याकडे पहात नैना खिन्नपणे म्हणाली, 'मीराताई कशाला हे सोपस्कर, बाळ असता कुशीत तर ठीक होतं.' म्हणत डोळ्यात आलेले अश्रू पदराने पुसत ती आत आली.

तिच्या पाठीवर थोपटत निनाद म्हणाला, 'नैना ते डोळे पुस. असं रडू नको ग चल घरा खोलीत जावून पड.' म्हणत तिला आत घेऊन आला. नैनाला येऊन आता पंधरा दिवस झाले होते. परंतु ती अधिकाधिक अबोल झाली होती. ह्या काळजीने आई, बाबा, मीरा, निनाद हवालदिल झाले होते. ही अशीच अबोल राहिली तर त्याचा विपरीत परिणाम तिच्या मनावर होईल. ह्या विचाराने सारे धास्तावले होते.

तिला बोलते करण्यासाठी सारेजण हरप्रकारे तिच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होते. पण तिने जणू मुक्याचे व्रत घेतले होते. आणि त्याला पिंजऱ्यात बंदीस्त असलेल्या पोपटाचा कलकलाट वाढत होता. तो कोणालाच शांतता मिळू देत नव्हता. त्याच्या ह्या कलकलाटाने सारेजण हैराण झाले होते. घरात त्याला सोडून देण्याविषयीचे विचार चालले होते. पण पटकन इतक्या वर्षाच्या सहवासाला लोभावलेले साऱ्यांचे मन तसे करण्यास धजावत नव्हते. त्या पोपटाने गोड गोड वाणीने सर्वांची मने काही काळ रिझवली होती. एखाद्या घरातल्या माणसासारखे त्याचे अस्तित्व सर्वांना परिचयाचे झाले होते. गेले १५ वर्षे तो पोपट ह्या पिंजऱ्यात बंदिवान होऊन पडला होता. सुरुवातीला छोटसं पिल्लू असतांनाच तो ह्या पिंजऱ्यात अडकला होता. पण वयात येताच पोपटाने काही वेळेला विचित्र आवाज काढून आपल्याला डांबून ठेवण्याबद्दलचा निषेध व्यक्त केला होता.

पण घरातील कोणालाच त्याची ही व्यथा समजली नव्हती आणि जाणून घेण्याची इच्छाही नव्हती. आता तो पोपट पूर्वीसारखा गोंडस न राहता त्याच्या अंगावरचे एकेक पीस गळून पडत होते. ह्याचाच अर्थ तो एखाद्या उघड्या बोडक्या वृक्षासारखा ओबडधोबड दिसत होता. ही त्याची अवस्था म्हणजे त्याचे वार्धक्य होते. ह्या बंदिस्त पिंजऱ्यात त्याची भावना वासना मरून गेली होती. त्याला मुक्तपणे विहार करणे, रानोमाळ भटकणे, सहजीवनाचा आनंद मनसोक्त लुटणे ह्या साऱ्यांपासून तो वंचित झाला होता.

आणि ह्या साऱ्यांचा निषेध नोंदविण्यासाठी अलिकडे त्याने कलकलाट करून सर्वांना भंडावून सोडले होते. आपल्यावरच्या अन्यायाची त्याला निश्चितच मनांत चीड उत्पन्न होत असणार. पण हा पिंजरा हेच आपले शेवटचे श्वास घेण्याचे ठिकाण आहे हे त्याला जाणवत असणार पण त्याच्या ह्या व्यथेचे कोणालाच भान नव्हते.

त्याच्या ह्या कलकलाटाचा त्रास नैनाला सहन होत नव्हता. तिची चिडचिड वाढू लागली. ती पोपटाकडे रागाने बघू लागली. ह्याच्या कलकलाटाने माझे मनस्वास्थ्य बिघडत आहे असे ती म्हणू लागली. पण तिचे बोलणे फारसे मनावर कोणी घेतलेच नाही आणि एक दिवस गावांत पक्षाविषयीचा अभ्यास केलेले काही पक्षीतज्ञ गावात आले होते. त्यांचे भाषण गावातील हॉलमध्ये ठेवले गेले. त्या कार्यक्रमाला नैनाने मीराबरोबर जायचे ठरविले. ती आज प्रथमच २ महिन्यांनी घरांतून बाहेर पडली होती.

आज तिला खूप मोकळे आणि प्रसन्न वाटत होते. हॉलच्या दारापाशी येताच हॉल पूर्णपणे श्रोत्यांनी भरलेला पहाताच ती त्या गर्दीतून वाट काढत काढत मीरा बरोबर आत गेली. कुठेतरी कोपऱ्यात थोडीशी जागा मिळताच मनातून सुखावली. कार्यक्रमास सुरुवात झाली आणि पक्षीमित्र म्हणून आलेल्या वक्त्याची भाषणे ऐकतांना त्यांचा प्रत्येक शब्द कानात आणि मनांत साठवून ठेवत होती.


ते जेव्हा पक्ष्यांना पिंजऱ्यात कोंडून ठेवणे या विषयावर बोलू लागले. तेव्हा ती आपल्या स्वतःच्या घरी असलेल्या पिंजऱ्यातील पोपटाविषयी विचार करू लागली. वक्ते सांगत होते. पक्ष्यांना कोंडून ठेवणे हा माणसांनी केलेला फार मोठा गुन्हा आहे. आपल्या करमणुकीसाठी व आपल्या हव्यासापायी माणूस मुक्या पशुपक्षांना बंदिवान करतो. त्याचे स्वातंत्र्य ओरबाडून घेतो. त्याचे सहजीवन उद्ध्वस्त करतो व त्यांना उडण्यास मुक्तपणे फिरण्यासाठी जे पंख असतात तेच आपल्या कृत्यांनी छाटून टाकतो. त्या पंखातले बळ हिरावून घेतो हे अतिशय घातक आहे. ही एकप्रकारची त्या प्राणीमात्राशी केलेली क्रूर थट्टा आहे. आपल्या छंदापायी त्याला डोलायला, बोलायला लावतो तेव्हा माणूस हा किती भावनाशून्य आहे ह्याचे प्रत्यंतर येत. त्यांची वैषयिक वासना तुम्ही मारता. त्यांना सहजीवन मिळू देत नाही हे तर फार मोठे पाप आहे. ह्या मुक्या प्राण्याचे, पक्ष्यांचे आपल्या माणसांच्या जीवनावर नकळतपमे आघात होतात. त्याचे मुकेपणाचे शाप आपणांस मिळतात. काही वेळेला त्याचे गंभीर परिणामही भोगावे लागतात. हा माणूस मात्र स्वतःला बुद्धिमान समजत असतो. आपण काय करतो ह्याचे त्याला भानही नसते. तेव्हा एवढेच कळकळीने सांगतो. त्यांना आपल्या बंधनात ठेवू नका. त्यांना मुक्तपणे विहार करू द्या. त्यांना बंधनात ठेवण्याचा तुम्हाला काय अधिकार आहे.

तेव्हा श्रोते हो, ह्याचा मनाशी विचार करा आणि आपल्या बंधनातून त्यांना मुक्त करा. तरच आम्ही त्याच्या विषयी केलेल्या संशोधनाचा उपयोग होईल. ह्या त्यांच्या वाक्याने नैनाला आतल्या आत गुदमरल्यासारखे होत होते. तिच्या डोळ्यासमोर पडवीत टांगलेला पोपटाचा पिंजरा जोर जोरात हालत आहे असा भास

होत राहिला. ती ताडकन उठून उभी राहिली. तिच्या मनाने उचल खाल्ली माझ्या बाबतीत जे आजपर्यंत चार वेळा घडलं ते ह्यामुळेच असणार.

आम्ही त्याच्या वासना, सहजीवन दडपून टाकले. तसेच त्यानेही मुकेपणानी शाप देवून माझे अंकूर खुडून टाकले असणार ह्या विचाराने तिच्या अंगावर सरसरून काटा आला. तिने मीराला बळेबळेच हाताला धरून बाहेर चलण्याविषयी आग्रह धरला व तिला ओढू लागली. तिच्या अनपेक्षित कृतीने मीरा घाबरली व तिच्या बरोबर बाहेर पडली. दोघीही निमुटपणे घराकडे आल्या. मीराशी एकही शब्द न बोलता घरी पडवीत पाऊल टाकताच तिने पिंजऱ्याकडे धाव घेतली. तिचा हा पवित्रा पाहताच मीराने तिला मागे ओढली. पण सर्व बळ एकवटून तिने मीराच्या हाताला हिसडा मारून पिंजऱ्याचा दरवाजा उघडला आणि डोळे विस्फारून किंकाळी मारली. पोपट अस्ताव्यस्तपणे दोन्ही पाय ताणून पिंजऱ्यांत गतप्राण झाला होता. त्याच्याकडे टक लावून पहात ती असंबद्धपमे बोलू लागली. सुटलास रे कायमचा सुटलास या बंदिखान्यातून म्हणून का रे अलिकडे तुझा कलकलाट वाढत होता. जाता जाता तू आपला निषेध नोंदवला होतास ना राजा. जा-जा उडून मी तुला या पिंजऱ्यातून मुक्त केले आहे. आता कधी कधी येवू नकोस. पुन्हा नाही ना येणार म्हणत बेफामपणे धावत सुटली. तिच्या ह्या विचित्र बोलण्याने सारीजण गोळा झाली. या साऱ्यांकडे गरागरा डोळे फिरवीत ती ओरडत म्हणाली, त्याला आयुष्यभर बंदिवान केलंत ना? आता भोगा त्याचे शाप.

त्याने शाप दिला आहे आपल्याला आणि म्हणूनच माझा अंकूर कधी टिकला नाही माझ्या पोटात म्हणत सैरावैरा घरभर धावत सुटली आणि धावता धावता उंबरठ्याला अडखळून पडली. क्षणभर काही सर्वांना कळण्याच्या आतच तिचा देह थंडगार झाला अगदी बर्फासारखा गार गार! ♦



## श्रद्धांजली - कै. श्रीपाद नारायण मराठे (जन्म : २६-०६-१९३० - मृत्यु : १०-०३-२०१९)

पाळी (ता. डिचोली) गोवा येथील प्रतिष्ठित मराठे घराण्यातील नवीन पिढीतील प्रथम पुत्ररत्न म्हणजे श्रीपाद. धाकट्या सर्व भावंडांचा दादा. वडील बंधुची जबाबदारी लक्षात ठेवून ती कसोशीने पार पाडण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता जणू!

पाळी व आजोळ वांते येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. त्या दरम्यान पाळीच्या एकत्र कुटुंबाची आर्थिक परिस्थिति ढासळली. कुटुंबाला सावरण्यासाठी अर्थार्जन व त्यासाठी योग्य शिक्षण घेणे आवश्यक आहे हे जाणून ते अकाली प्रौढ झाले. पुढील शिक्षणासाठी एकटे कर्नाटकातील बेळगाव येथे आले. कधी नातेवाईकांच्या तर कधी समाजातील सहृदय लोकांच्या आधारे, देवपूजेची छोटीमोठी कामे करीत, कधी अर्धपोटी राहून माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर लगेच पोस्ट खात्यात नोकरी धरली.

येथून पुढे आपल्या पाठच्या सहा भावंडांचे पोषण करण्यासाठी व त्यांचे शिक्षण,पूर्ण करण्यासाठी दादा तन-मन-धनासह झटले. त्याकाळात स्वतःची पत्नी व संसार यांना त्यांनी दुय्यम स्थानी ठेवले. पुढे भावांच्या मदतीने पाळी येथील वडिलार्जित जमीन कर्जमुक्त केली, तेव्हाच आजवरच्या कष्टाचे सार्थक झाले असे दादांना वाटले. आपल्या पोस्ट खात्यातील कारकिर्दीतही त्यांनी अनेक आव्हाने समर्थपणे पेलली. ह्याच काळात त्यांनी बहिस्थ पद्धतीने बी. ए. ची पदवी प्राप्त केली. उत्तरोत्तर प्रगती करत ते पोस्टमास्तर पदी निवृत्त झाले. सम्पूर्ण जीवनात दादा पापभीरु, प्रामाणिक, सज्जन, मदतशील व्यक्ती म्हणून प्रसिद्ध होते. नातेवाईक व परिचित-अपरिचितांसाठीही योग्य मार्गदर्शन व आर्थिक मदतीसाठी त्यांचा हात सदैव पुढे असे. त्यांनी अनेक विवाह जुळवले. बेळगावातील संस्कृत संघ, पेन्शनर संघ, चित्पावन संघ, पोस्टल कर्मचारी युनियन, पोस्टल कंझ्युमर सोसायटी यांचेसाठी भरीव कार्य केले.

निवृत्तीपश्चात दादांनी अल्पबचत गुंतवणूक सल्लागाराचे काम जोमात केले व बेळगावात स्वतःचे घर खरेदी केले आणि उर्वरित जीवन सुबत्ता व सुखात व्यतीत केले. याचे श्रेय दादांच्या शांत, समाधानी स्वभावाइतकेच कुटुंब छोटे राखण्याचा धोरणी निर्णय व पत्नी सुधा यांची कष्टाळू साथ ह्यांना जाते.

इ. स. २०१२ मध्ये पत्नीनिधनानंतर उर्वरित आयुष्य दादांनी कोल्हापुर व गारगोटी येथे मुली- जावई व नातवंडांसह व्यतीत केले. पणतवंडे पाहण्याचे भाग्यही त्यांना लाभले. ह्या काळात त्यांनी लेखनाचा छंद जोपासला. विविध मासिकांमधून त्यांच्या लघुकथा प्रकाशित झाल्या. वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी मोडी लिपीचा सहा महिन्याचा अभ्यासक्रम पूर्ण करुन, परीक्षा देऊन प्रमाणपत्र मिळवले. प्रथमपासून जीवनातील घटनांविषयी शिस्तबद्ध टिपणे, कात्रणे ठेवणे ही दादांची खासियत होती. त्यांच्या सहाय्याने वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी 'मराठेंची बखर' हे आत्मचरित्रपर पुस्तक प्रकाशित केले. ते मराठे घराण्यातील प्रत्येकास उपयुक्त ठरेल. पोस्ट तिकिटे, नाणी, पुस्तके यांचा संग्रह, वाचन, आकाशवाणी-दूरचित्रवाणी वरील बातम्या ऐकणे हे दादांचे छंद होते. आपल्या जीवनातील सर्व लोकसभा-विधानसभा निवडणुकांमध्ये आपण न चुकता मतदान केले याचा त्यांना अभिमान होता. अल्पशा आजारानंतर वयाच्या ८८ व्या वर्षी हिंडत्या-फिरत्या स्थितीत दादांना पुण्यमरण आले व मराठे घराण्यातील एक पर्व संपले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो ही प्रार्थना!!

**- कन्या वंदना** (९९७५३३४६४१)

# चॅम्पियन

• सौ. ज्योती सुधीर शेठ, महाड

रात्र सुटल्याची घंटा झाली. आणि सर्व वर्गातील मुले वर्गावर्गातून बाहेर पडली. मुलांचे घोळके दंगामस्ती करत फाटकाच्या बाहेर पडत होती. ज्यांच्या सायकली होत्या त्या सायकलीच्या घंटा जोरजोरात बडवत वाट काढत होती. ज्यांच्या नव्हत्या ते सावकाशपणे बाहेर पडली. मी शाळेच्या वऱ्हाड्यांतून हे सारे दृश्य नजरेने टिपत होते. आणि हे सारे पहात असताना माझं लक्ष सायकल स्टँडकडे गेले. एक मुलगा आपल्या जुन्या झालेल्या सायकलची चेन परतपरत लावण्याचा प्रयत्न करीत होता. माझ्या शेजारीच उभ्या असलेल्या जोशी मॅडमना मी प्रश्न केला तो विद्यार्थी कोण. कारण मी स्वतः मुख्याध्यापिका असल्यामुळे सर्वच विद्यार्थ्यांशी तसा वरचेवर संबंध येत नाही. त्यामुळे तो नक्की कोणत्या वर्गात आहे. हे पण माहीत असल्याच कारणच नव्हत. तेवढ्यात माझ्या शेजारून एक मुलगा स्वतःच्या दप्तराच ओझं कसं बसं सांभाळत धापा टाकत त्या चेन लावणाऱ्या मुलाकडे धावत जाताना म्हणाला, ''ए दिलप्या काय झाल रे सायकलला? मला वाटलं तुझी सायकल आहे तू गेला असशील.'' त्यावर रडलेल्या सुरांत तो म्हणाला ''नाही रे मनोज. ह्या जुन्या सायकलीने वात आणलाय बघ.'' त्यावर मनोज म्हणाला ''अरे ती खरच आता भंगार झाली आहे. आता नवीन घे ना यार.'' त्यावर खिन्नपणे दिलीप म्हणाला, ''नवीन शक्य नाही, आई म्हणते नवीन सायकलच नावही काढू नकोस. एव्हढं वर्ष वापर मग बघु. ए मनोज तू बघ एकदा प्रयत्न करून.'' ''दिलीप त्या दिवशी तुझ्या ह्या जुन्या सायकलवरून तो हरामखोर जय तुला चिडवत होता तेव्हा मी असा चिडलो होतो ना? आणि तुही रडकुंडीस आला होतास म्हणून! नाहीतर मी त्याला चोपला असता. स्वतःच्या श्रीमंतीचा माज आहे साल्याला.'' असं म्हणून मनोज सायकलशी खटपट करत राहीला. त्या दोघांच संभाषण मी लक्षपूर्वक ऐकत होते. तेवढ्यात जोशी मॅडम म्हणाल्या, ''मॅडम चला, दामुने किल्ल्या दिल्या आहेत माझ्याजवळ.'' त्या माझ्या हातावर ठेवत त्या चालू लागल्या.

पण मी मात्र तिथेच उभी राहून त्यांची सायकल दुरूस्तीची खटपट पहात होते. खूप वेळ खटपट करून एकदा ती चेन सायकलीला लागली आणि दोघेही डबल सीट बसून फाटकाबाहेर पडले. मी पण विचारांच्या तंद्रीत स्कुटीला किक मारली आणि निघालो. खरी पण त्या विद्यार्थ्याला नवीन सायकल घेणे का परवडत नसते ह्या विचारांने त्रस्त झाले. काय बरे आर्थिक अडचण असावी त्याच्या आईची हे कळेना. विचारांच्या तंद्रीत घराच्या फाटकांत शिरताच विचारांना मनात ठेवून घरात प्रवेश केला.

दुसऱ्या दिवशी शाळा भरल्यावर तो विद्यार्थी. कोणत्या वर्गात आहे ह्याचा शोध घेऊन मी त्याला ऑफ पिरियडला केबीनमध्ये बोलावून घेतले. मी का बोलावले आहे ह्या धास्तीने माझ्या समोर येताच तो थोडा कावरा बावरा झाला. मी त्याला सहजपणे म्हटल ''काय दिलीप सायकल काल गेली ना घरापर्यंत चेन न पडता.'' त्यावर तो आश्चर्याने म्हणाला, ''मॅडम तुम्हाला काय माहीत.'' ''बघ मला कसं कळलं?. मग सायकल टाकलीसना दुरूस्तीला.'' ''हो मॅडम आई म्हणते... आपली सायकल जुनी असली तरी मजबूत आहे. तिला एकदा व्यवस्थित फिनिशिंग केलं की छान नव्यासारखी होईल बघ. मला आईच बोलणं पटलं.'' ''खरं आहे आईचं! काय रे, पण तो जय तुला का चिडवतो.'' ''माझी सायकल जुनी आहे भंगार आहे असं म्हणतो. पण मॅडम एक दिवस मी त्याच्याशी रेस लावून त्याला दाखवून देईन. माझी सायकल किती मजबूत आहे ती.'' ''बरं... जा तू आता वर्गात.'' म्हणत मी पण दहावीच्या वर्गात गेले. मधे आठ ते दहा दिवसांचा अवधी गेला. आणि दिलीप एक दिवस बाजारात भेटला त्याच्या सायकलसह.'' मॅडम तुम्हाला मात्र एक गंमत सांगायची आहे. मी तुम्हाला त्या दिवशी म्हटल्याप्रमाणे जयशी सायकल रेस लावली आणि ती रेस जिंकलो सुद्धा माझे इतर मित्र होते ती रेस पहायला. आता कशी वाटते माझी सायकल? हिरो आहे हिरो.'' त्याच्या बोलण्यात आनंद मला खूप काही सांगून गेला. त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप मारत म्हटलं ''खरंच... तू चॅम्पियन आहेस.'' त्यावर तो हळवा होत म्हणाला, ''मॅडम बाबा आता नाहीत पण ती सायकल माझ्या बाबांची आहे. त्यामुळेच माझे बाबा माझ्याजवळ ह्या सायकलच्या रूपात आहेत.'' असे म्हणत हळूच डोळे शर्टाच्या बाहीला पुसत तो क्षणांत सायकलवर स्वार होऊन नजरेआड झाला सुद्धा. त्याची ही दुखरी वेदना मनाला तीव्रतेने स्पर्श करून गेली.

♦

# स्वरानुराधा

◆ स्वाती कर्वे

अनुराधा मराठे या ज्येष्ठ गायिकेचे 'स्वरानुराधा' हे आत्मचरित्र अलीकडेच पुण्याच्या 'अनुबंध प्रकाशन'ने प्रसिद्ध केले. त्यांच्या स्वभावासारख्याच नितळ छायाचित्राचे मुखपृष्ठ आणि आतील कलात्मक मांडणी, भरपूर छायाचित्र यांनी ते देखणे झाले आहे.

यातील बऱ्याच आठवणी, किस्से त्यांनी आधी स्वतः लिहिले. मग इतर माहिती एकत्र करण्यासाठी नेहा वैशंपायन यांनी काही प्रश्न, माहिती विचारून, लिहून काढून सर्व लिखाणावर त्यांनी संस्कार केले आणि सुंदर, वाचनीय, मार्गदर्शक पुस्तक आकाराला आणले. वाचकाशी थेट संवाद साधणारी ही लेखणी वाचकाला भावते..

आपल्यावर निर्मळपणा आणि प्रांजळपणाचे संस्कार करणाऱ्या आईवडिलांना हे पुस्तक त्यांनी अर्पण केले आहे. तसेच यशवंत देव, हृदयनाथ मंगेशकर आणि अशोक पत्की या वेगवेगळ्या काळातल्या संगीतदिग्दर्शकांनी अनुराधाबाईंना या पुस्तकासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

अतिशय सुंदर टप्प्यांमध्ये हे पुस्तक विभागलेलं आहे, ते खूप वैशिष्ट्यपूर्ण आहे.

प्रथम माहेरघर, भावंडांचं प्रेम, संस्कार, शालेय शिक्षण, त्यानंतर पुण्यातले लग्नानंतरचे वास्तव्य, पुण्यात शास्त्रीय संगीतासाठी जानोरीकर बुवांकडे जाणं – घरातली माणसे – वातावरण – मुलींच्या जन्मापासून ते थेट नातवंडांपर्यंतचा प्रवास.

पुढच्या प्रकरणात गुरू आणि संगीत शिक्षण याविषयीचे सविस्तर लेखन – डॉ. श्रीपाद नाईकसर, पं. त्र्यंबकराव जानोरीकर, गजाननराव वाटवे आणि राम कदम यांच्याकडचा संगीतप्रवास.

यानंतर ४०–४२ वर्षे चालू असलेला रंगमंचीय कार्यक्रमांचा विस्तृत प्रवास – प्रामुख्याने यामध्ये आलेले चित्रपटसंगीत. मग भावसंगीताविषयी विशेष माहिती देणारे भावस्वरयात्री संगीतकार यशवंत देव, श्रीनिवास खळे आणि हृदयनाथ मंगेशकर यांच्याबरोबरचा संगीतप्रवास आणि त्यांचे मार्गदर्शन.

आकाशवाणी आणि दूरदर्शनला त्यांनी 'भावसंगीताचे आधारवड' म्हटलंय. दोन्हीकडे त्यांना विपुल प्रमाणात गायला मिळाले. जुन्या ध्वनिमुद्रणाच्या कलेची माहिती आणि तिथले बुजुर्ग यांच्याविषयीही यामध्ये सविस्तर वाचायला मिळते.

नव्या शतकामध्ये त्यांना पुन्हा एकदा अभिनयाकडे वळता आले. मोजकेच चित्रपट आणि नाटकं यातून त्यांना कधी लहान तर कधी मोठ्या वेगळ्या भूमिका करायला मिळाल्या – त्यातील अनुभव आणि त्यात केलेले आश्चर्यकारक प्रयोग वाचकाला चकित करतात.

एकूणच या प्रवासात स्वतःला घालून घेतलेली बंधने, शिस्त, घर सांभाळणे, आहे त्यात समाधान मानले तरी स्वतःच्या एकटीच्या प्रयत्नांनी पुढे चालत राहणे, केवळ बोलणे आणि गाणे याच साधनसामग्रीवर माणसे जोडणे... एकूण फलश्रुतीविषयी 'मागे पाहताना...' मध्ये मनःपूर्वक लिहिले आहे– ते मार्गदर्शकही ठरेल. या वाटेवर चालू इच्छिणाऱ्यांचे मनोबल वाढवेल.

शेवटी दिलेली कॅसेटस्, सीडीज्, रंगमंचीय कार्यक्रमातली त्यांची वेगळी – स्वतंत्र गाणी, आकाशवाणी – दूरदर्शनवरची गाणी यांची यादी पाहून त्यांच्या कामाबद्दल मनोमन आश्चर्य वाटत राहते, आवाका जाणवतो आणि तरीही आपण यातले फार थोडे ऐकू शकलो याबद्दल वैषम्यही!

प्रामुख्याने त्यांची ओळख आपल्याला झाली ती रेकॉर्डेड गाणी कार्यक्रमातून गाणारी गायिका म्हणूनच. परंतु त्यातूनही त्यांचा स्वतःचा असा श्रोतृवर्ग – चाहतावर्ग निर्माण झाला.

आपले गाण्यातील गुरू, नंतरही निमित्ताने भेटलेले सुधीर फडके, राम कदम, खळे, जोग यांच्यापासून अनेक संगीतकार, सहगायक अशा कितीतरी कलाकारांची व्यक्तिचित्रे यातून उभी राहतात. सहवासात आलेल्या सर्व गायक–वादक कलाकारांची वैशिष्ट्ये अत्यंत थोडक्या शब्दात त्या व्यक्त करतात – ती प्रशंसनीय आहेत.

सुगमसंगीत गाणाऱ्या पिढ्याच्या पिढ्या तयार होत असताना ते कसे अवघड आहे आणि त्यांना मार्गदर्शक ठरतील असे बारकावे अनुराधाबाईंनी पुस्तकात सहज मांडले आहेत. केवळ आत्मबळावर

| स्वरानुराधा | | | |
|---|---|---|---|
| **लेखिका** | अनुराधा मराठे | **शब्दांकन** | नेहा वैशंपायन |
| **प्रकाशन** | अनुबंध प्रकाशन, पुणे | **पृष्ठ** | २६४ |
| **किंमत** | ३६०रु. | | |

आपला आनंद आपण कसा पदरात पाडून घ्यावा आणि इतरानांही द्यावा - हे या पुस्तकात कानमंत्र दिल्याप्रमाणे सापडते. कार्यक्रम सादर करताना ऐनवेळी कोणत्या प्रसंगांना तोंड द्यायला लागू शकते आणि त्यासाठी आपली तयारी असायला हवी - ती कशी - हेही यामधून लक्षात येते. गाण्यातल्या अगदी छोट्या ताना - मुरक्यांच्या स्वरावल्या सुगम गायकांना मार्गदर्शक ठरतील.

नाटकातल्या थोडक्या भूमिकांमध्ये त्यांनी केलेले विशेष प्रयत्नही उभरत्या कलाकारांना मार्गदर्शक ठरावेत.

अशा अनेक कारणांसाठी हे पुस्तक संग्राह्य ठरू शकेल.

नेहा वैशंपायन यांचे शब्दांकन अनुराधा मराठे यांच्या व्यक्तिमत्त्वाला नेमक्या तऱ्हेने पुस्तकातून पुढे आणते, हे विशेष!

**प्रेषक - श्री. कालिदास मराठे** (पृ. ५४१), गोवा

# देणगीदार व वर्गणीदार सूची

## (एप्रिल २०१८ ते मार्च २०१९)

**वर्गणीदार:**

**आजीव सभासदत्व: रु. ५००/-**

अनामिक, शशांक श्याम (बेळगावी, कर्नाटक), गौरव हेमंत (पुणे), संजय सखाराम (ठाणे), दिलीप चिंतामण (इंदौर, म.प्र.)

**हितगुज सभासदत्व:** रु. २,०००/-

गौरव हेमंत (पुणे), संजय सखाराम (ठाणे), सुधाकर दत्तात्रय (पुणे), मानसी योगेश गाडगीळ (पुणे), दिलीप चिंतामण (इंदौर, म.प्र.), प्रमोद बाळकृष्ण चक्रदेव (पुणे), संजीव मराठे (पुणे)

**देणगीदार:**

**शिक्षण निधी देणगी : रु. ४०,०००/-**

श्रीनिवास अनंत (दादर, मुंबई)

**हितगुज निधी देणगी:**

५,०००/- अरुण भिकाजी (तळेगाव), रु. २,५००/- अनंत वामन (अंधेरी, मुंबई), रु. रु. २,०००/- अरुण दत्तात्रय (पुणे), रु. १५००/- शुभदा दीपक (गोवा), रु. ७५१/- शशांक श्याम (बेळगावी, कर्नाटक)

**हितगुज-जाहिरात: रु.१,२००/-**

दत्तात्रय कृष्णाजी (चांदिवली, मुंबई)

**वर्धापन दिनाप्रीत्यर्थ देणगी:**

सर्व पुणे: रु.११,०००/- सीमा बाळकृष्ण, रु. १०,०००/- एअर कमोडोर (नि.) मधुकर कृष्ण, रु. ५०००/- प्रभाकर बाळकृष्ण, रु. १०००/- वीणा वसंत, रु. ६००/- विजय विष्णू, रु. ५०१/- श्रीधर अ., चंद्रशेखर वि., रु. ५००/- प्रत्येकी: - अविनाश रा., मोहन मराठे, श्रीकृष्ण सिद्धेश्वर, गणेश अनंत, जयश्री वासुलकर, रु. ४००/- गजानन चिंतामणी, रु. २०१/- आशा चंद्रकांत, रु. १०१/- संजय लक्ष्मण विद्वांस, रु. १००/- प्रत्येकी:-सुनिता प्रभाकर, अरुण दत्तात्रय

**वाढदिवसाप्रीत्यर्थ देणगी:**

रु. ५००/- (प्रत्येकी) विजय विष्णू (पुणे), धनश्री विजय (पुणे), आसावरी गजानन, गजानन चिंतामणी (पुणे)

**स्मृती प्रीत्यर्थ: रु. १०००/- प्रत्येकी :**

प्रतिभा सुधाकर (पुणे), गजानन चिंतामणी (पुणे)

**अन्य कारणासाठी देणगी:**

रु. ३,०००/- निबंध स्पर्धा पारितोषिकांसाठी, (वामन गणेश (पुणे), रु. ५,०००/- उद्योजकता पुरस्कारासाठी-अजित श्रीराम

### -: अत्यंत कळकळीची विनंती :-

प्रतिष्ठानला देय शुल्क अथवा देणगी आपण IDBI बँकेच्या कोठल्याही शाखेत जाऊन, 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने IDBI बँक, दादर-प, या शाखेतील बचत खाते क्र. 0501104000043519 मध्ये रोख किंवा चेकने भरू शकता.

वरील खाते क्र. 16 आकडी असून सुरुवातीचा 0 आकडा लिहिणे अत्यावश्यक आहे. अन्यथा दुसऱ्या व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते किंवा आपल्या खात्यात परत येऊ शकते.

अशा प्रकारे रक्कम प्रतिष्ठानच्या खात्यात जमा केल्यावर आपले नाव, पूर्ण पत्ता, रक्कम व ती भरल्याचा दिनांक, चेक/NEFT/IMPS/ मोबाईल बँकिंग द्वारे दिली असल्यास त्याचा नंबर/ संदर्भ क्र. तसेच ज्या कारणाने रक्कम भरली ते कारण आदी माहिती admin@marathepratishthan.org या ई-मेल वर अवश्य कळवावी म्हणजे पावती देणे सोपे होईल.

# मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिके

• श्री. हेमंत अरुण मराठे, (पृ.२१), नालासोपारा भ्रमणध्वनी – ९८२२८४७१२०/९२२०६९९९५७

**मराठे प्रतिष्ठानद्वारा गुणवत्ता पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असेल.**

१) इयत्ता ५ वी आणि इयत्ता ८ वी, प्राथमिक आणि माध्यमिक स्कॉलरशिप परीक्षा – इयत्ता ५ वी, रु. २००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला.
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ३००/–
इयत्ता ८वी – रु. ३००/–चे पारितोषिक, स्कॉलरशिप प्राप्त प्रत्येकाला
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ४००/–

२) इयत्ता १० वी – ८५% ते ९०% गुण प्राप्त करणाऱ्यास रु. ८००/– ९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ५००/–

३) इयत्ता १२ वी –
आर्टस्/कॉमर्स :
७०% ते ८०%– रु. ७००/–
८०% ते ९०%– रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सायन्स : ८०% ते ९०% – रु. ८००/–
९०% पेक्षा जास्त रु. १०००/–
सर्वांत जास्त गुण प्राप्त करणाऱ्यास 'कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक' रु. ६००/–

४) पदवी – B.A., B.Com. B.Sc.,
सर्व ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्यांस रु. १२००/–

५) पदव्युत्तर –M. A., M.Com., M.Sc.
प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम २ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/–
C.A., L.L.B., Enginear, Medical प्रत्येक शाखेतील सर्वप्रथम विद्यार्थ्यास रु. १५००/–

६) विशेष नैपुण्य, (नृत्य/कला/ अभिनय)
राज्य अथवा राष्ट्रीय पातळीवरील पुरस्कारप्राप्त, व्यक्तीस रु. १५००/–

याशिवाय देण्यात येणारी पारितोषिके पुढीलप्रमाणे.

- गणेश तांत्रिक पारितोषिके रु.५००/– तांत्रिक विषय घेऊन उच्च श्रेणी मिळवल्यास अथवा, १० वी नंतर तांत्रिक शाखेमध्ये प्रवेश घेणाऱ्यास
- इयत्ता १० वी बोर्डात हिंदी विषयामध्ये सर्वप्रथम – रु. १००/–
- इयत्ता १० वी बोर्डात इंग्लिश विषयामध्ये सर्वप्रथम – रु. ५००/–
- (लीला दिगंबर मराठे नाशिक यांनी हे पारितोषिक पुरस्कृत केले आहे.)
- नॅनोटेक्नॉलॉजी मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास श्री. वा. ग. मराठे, पुणे यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- वैदिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास कै. श्रीमती शालिनीताई मराठे, मुंबई यांनी एक स्कॉलरशिप पुरस्कृत केली आहे.
- श्री. प्रमोद मराठे ठाणे पुरस्कृत (कै. सौ. माधुरी प्रमोद मराठे स्मरणार्थ). दहावीत सर्वात जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला.

यशस्वी व पारितोषिकपात्र विद्यार्थ्यांनी दि. १५ जुलै २०१९पर्यंत आपापल्या गुणपत्रिकांची प्रत मराठे प्रतिष्ठानच्या पत्त्यावर पोस्टाने अथवा info@marathepratishthan.org या ई–मेलवर पाठवावी. विजेत्यांची सूची या वर्षीच्या वार्षिक अहवालात प्रसिद्ध करण्यात येईल. तरी निकाल प्राप्त झाल्यावर लगेचच गुणपत्रिका पाठवाव्यात ही विनंती.

निकाल उशिरा लागले तर वरील मुदतीनंतर देखील गुणपत्रिका पाठविल्यास पारितोषिकांसाठी विचार होऊ शकेल. मात्र त्या परिस्थितीत प्रथम क्रमांकासाठीची पुरस्कृत पारितोषिके देणे शक्य होणार नाही. ऑगस्ट/सप्टेंबर २०१९ मध्ये होणाऱ्या या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पारितोषिकांचे वितरण करण्यात येईल त्यामुळे त्याच्या १० दिवस अगोदर पर्यंत येणाऱ्या गुणपत्रिकांचाच विचार पारितोषिकासाठी होऊ शकेल याची कृपया नोंद घ्यावी.

**ई–मेल : info@marathepratishthan.org**

♦

# संवादिनी लहान बाळासारखी सांभाळावी!

• श्री. प्रमोद मराठे (पृ. १२८), पुणे

सर्वसाधारणपणे प्रत्येक क्षेत्रातल्या व्यक्तीला विचारला जाणारा पहिला प्रश्न असतो : 'तुम्ही या क्षेत्रात कसे आलात?' डॉक्टर, इंजिनिअर त्यांचं शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात पदार्पण करतात; पण संगीतक्षेत्रात तसं नसतं! मला हा प्रश्न एकदा विचारला गेला होता, तेव्हा मलाच प्रश्न पडला की 'माशाला प्रश्न विचारतात का, की 'तू पाण्यात (सागरात) कधीपासून आलास?' माझे आतोबा (आत्याचे यजमान) पंडित विनायकराव पटवर्धन (पुण्यातल्या गांधर्व महाविद्यालयाचे संस्थापक), वडील धुंडिराजपंत, काका अनंतराव, मातुःश्री, ज्येष्ठ भगिनी असं सगळंच कुटुंब पूर्ण वेळ संगीत करणारं होतं. त्यामुळे वरील प्रश्नाविषयी माझं उत्तर असं, की मी स्वरसागरात येणारच होतो... आणि आलो!

नूतन मराठी विद्यालय व गांधर्व महाविद्यालय इथं लौकिकार्थानं माझं शालेय व सांगितिक शिक्षण झालं. वडील धोंडूमामा प्राचार्य असल्यानं जाणत्या-अजाणत्या वयातच मी संस्थेत जाऊ लागलो. संगीतशिक्षणाची सुरुवात अर्थातच कंठसंगीतानं झाली. इयत्ता दुसरी ते नववीपर्यंत तब्बल आठ वर्षं 'प्रारंभिक ते विशारद परीक्षे'पर्यंतचा गायनाचा अभ्यास वडिलांच्या मृदू मार्गदर्शनाखाली झाला. मृदू म्हणण्याचं कारण असं, की माझे वडील कधीच रागावत नसत. मात्र, त्यांना जे हवं ते ते माझ्याकडून गोड बोलून करवून घेत. उदाहरणार्थ : तबल्यावर सर्व ताल वाजवता यायला यावेत, तानपुरा मिळवता व वाजवता यायला हवा, सतार, व्हायोलिन, दिलरुबा, जलतरंग, यांचं ट्यूनिंग यायलाच हवं... हा त्यांचा आग्रह असे. सोपे राग व सिनेमातली गाणी त्यांनी मला वाजवायला शिकवली. पुढच्या आयुष्यात मला याचा सांगीतिक फायदा खूपच झाला. वैयक्तिक संगीतप्रवास उलगडायचा झाल्यास विद्यार्थी, कलाकार, गुरू किंवा मार्गदर्शक, प्रशासक (गांधर्व महाविद्यालयाचं संचालन) संयोजक (विविध प्रकारच्या कार्यक्रमांचं संयोजन) असा बहुपैलूत्वाचा आहे.

'प्रत्येक कलाकार अथवा गुरू आयुष्यभर विद्यार्थीच असतो' या विधानाशी मी शंभर टक्के सहमत आहे. लहानपणापासून वडिलांनी एक गोष्ट मनावर बिंबवली व ती म्हणजे 'कान, डोळे, स्वतःची बुद्धी सतत जागृत ठेव. चांगल्या गोष्टीचं सतत ग्रहण करत जा. लहान-मोठा असा कुठलाही विचार न करता!' याविषयी मला उस्ताद झाकीर हुसेन यांचंही एक वाक्य मला सतत स्मरतं. ते एकदा म्हणाले होते : 'प्रत्येक व्यक्तीला आई-वडील असतात अन् त्यांच्याविषयी त्या व्यक्तीला प्रेम व आदरही असतो, यात विशेष काहीच नाही; पण आपल्याला काका, मामा, मावशी, थोरले भाऊ, धाकटे भाऊ असतात, त्यांच्याविषयीसुद्धा आपल्याला प्रेम, आदर असतो. तद्वत् संगीत हेही आपलं कुटुंबच आहे व गुरूंप्रमाणेच सर्वांना मान व प्रेम द्या.' झाकीरजींच्या या वक्तव्याचा माझ्या मनावर खोलवर झालेला परिणाम, पडलेला प्रभाव हे माझ्या सांगितिक यशाचं इंगित अर्थात गुपित आहे, असं मी विनयानं सांगू इच्छितो. लहान वयात जसं सगळ्यांचंच कौतुक होत असतं, तसंच माझंही कौतुक झालं, लाड झाले. आकाशवाणीवर 'बालोद्यान' कार्यक्रमात भैरव रागगायन, एक-दोन समूहगायनांत सहभाग, शाळेत कवितांना चाली लावून गायन असं सुरू होतं. मात्र, मला कधीच विशेष व वेगळी वागणूक घरातून दिली गेली नाही, हे मला प्रकर्षानं आठवतंय. हेही आठवतंय की, माझ्या अनेक परदेशदौऱ्यांनंतर, मोठ्या कलाकारांना मी केलेल्या साथीनंतर, रसिकांकडून कौतुकोद्गार मिळाल्यानंतरसुद्धा माझे वडील म्हणायचे : 'ठीक आहे, अजून त्याला काहीच येत नाही. खूप काही करायचं बाकी आहे.'

झाकिरजींचं ते वाक्य, वडिलांचं माझ्याबद्दलचं मत आणि मालिनी राजूरकर, वीणा सहस्रबुद्धे व पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या प्रदीर्घ सहवासानं व शिकवणुकीतून माझे पाय जमिनीवर राहिले, असं मी कृतज्ञतापूर्वक म्हणेन. नववीपर्यंतचा माझा गायनप्रवास रडत-खडत झाला. कारण, तेव्हा आई-वडिलांची जबरदस्ती होती. नववीत माझा आवाज फुटला, गायन बंद झालं अन् मला अत्यानंद झाला! (जे त्या वेळी वाटलं ते प्रामाणिकपणे सांगितल्याबद्दल रसिकांनी माफ करावं!). त्या वर्षभर मी महाराष्ट्र मंडळातल्या आखाड्यात रोज सायंकाळी मातीवरच्या कुस्तीचं रीतसर शिक्षण घेतलं. जोर, बैठका, कुस्ती, पोहणं याचा मला प्रचंड फायदा झाला. खिलाडूवृत्ती, झुंजारवृत्ती, येईल त्या संकटाशी सामना, रियाजाकरिता वाद्यं वाहून नेण्यासाठीची प्रचंड शारीरिक क्षमता यातून निर्माण झाली. अर्थात तेव्हा व्यायामाची लागलेली गोडी अजूनही टिकून आहे व तीसुद्धा 'तालीम' मी माझ्या शिष्यांना देत आहे.

माझ्या विद्यार्थिदशेतल्या काही सुवर्णक्षणापैकी एक म्हणजे परवीन सुलतान यांची त्यांच्या घरी झालेली भेट आणि त्यांच्या

मधुर वाणीतून माझ्या मनावर कायमचं कोरलेलं एक वाक्य : 'प्रमोद, रियाज म्हणजे बँकेत केलेली बचत आहे. तरुणपणात खूप खूप रियाज/बचत करा आणि पुढं आयुष्यभर त्यावरील व्याजावर सुंदर आयुष्य जगा!'

परवीनजींशिवाय पुण्यातले त्या वेळचे प्रख्यात तबलावादक उस्ताद गुलाम रसूल व पंडित चंद्रकांत कामत यांच्या शिकवणुकीतून माझ्या वयाच्या १९ ते २३ पर्यंत माझा प्रचंड रियाज झाला. दिवसात कमीत कमी आठ ते जास्तीत जास्त २० तासांपर्यंत मजल पोचली होती. असो! गायनशिक्षण थांबून एक वर्षं कुस्तीचं प्रशिक्षण झालं आणि चमत्कार घडावा अशी घटना एके दिवशी घडली.

माझे मित्र आणि माझे पहिले (हार्मोनिअम) संवादिनीगुरू दिलीप गोसावी हे नोकरीनिमित्त सहा महिने कल्याणहून पुण्याला आले. त्यांचा मुक्काम गांधर्व महाविद्यालयात होता. (माझे वडील आणि दिलीप यांचे वडील वसंतराव हे गुरुबंधू). दिलीप यांचं हार्मोनिअमवादन ऐकून मी या वाद्याकडं आकृष्ट झालो. त्यांच्याकडं शिक्षण सुरू झालं अन् दोन महिन्यांनी दिलीप पुन्हा कल्याणला परतले. त्यानंतर १५ पैशांच्या पोस्टकार्डच्या माध्यमातून संपर्क असायचा किंवा परतीच्या भाड्याइतके पैसे जमले की मी कल्याणला जायचो. अशा प्रकारे सुमारे दोन वर्षं शिक्षण घेतलं. महिन्यातून किंवा दोन महिन्यांतून एका शनिवारी/रविवारी हे शिक्षण व्हायचं. दिलीप यांचे वडील वसंतराव हे कल्याणच्या 'दिनकर संगीत विद्यालया'चे प्राचार्य होते. त्याच विद्यालयात रात्री १० ते सकाळी सहा असं हे शिक्षण चाले. दिलीप यांच्याकडं दोन-तीन वर्षं शिक्षण झाल्यावर त्यांनी त्यांचे गुरू पंडित मनोहर चिमोटे यांच्याकडं शिक्षण घेण्याचा सल्ला मला दिला. मग माझी यात्रा पुणे-दादर सिंहगड एक्स्प्रेसनं दादरला व तिथून दादर-विरार लोकलनं गुरुजींच्या घरी... अशी सुरू झाली. तिथं स्नान, भोजन, दुपारची विश्रांती, विरार-गोरेगाव प्रवास, (क्लास गोरेगावला होता) सायंकाळी पाचपासून शिक्षणाला प्रारंभ, कमीत कमी चार-पाच तास शिक्षण, त्यानंतर रात्रीचं भोजन एकत्र, त्यांत वैचारिक गप्पांमधून शिक्षण व शेवटच्या लोकलनं गुरुजी विरारला जात व मी मुंबई सेंट्रलला येऊन रात्री दीडच्या शेवटच्या एशियाड बसनं पुण्याला परतत असे. असा तो सगळा क्रम होता. या सर्व गोष्टींचा माझ्या मनावर असा सुपरिणाम झाला, की विद्यार्थ्यांना त्रास होऊ न देता त्यांना जास्तीत जास्त मुक्त हस्तानं विद्यादान करायचं, असं मी ठरवलं. माझ्या वयाच्या २१-२२ व्या वर्षी एक विलक्षण कलाटणी माझ्या आयुष्याला मिळाली, 'डी.एस. रामसिंग कंपनी'च्या हामोनिअमच्या प्रेमात मी पडलो. काहीही करून ती मिळवायचीच, असा माझा विचार मी वडिलांना सांगितला. त्या वेळी तिची किंमत होती १८०० रुपये. किंमत ऐकल्यावर वडिलांनी अतिशय सौम्य भाषेत सुनावलं : 'पैसे झाडाला लागत नाहीत, स्वतः कमव व विकत घे.'

माझ्या मेहुण्यांच्या कंपनीचं तेव्हा चंद्रपूरला काम सुरू होतं. नवीन हार्मोनिअम विकत घ्यायची म्हणून मी तिथल्या औष्णिक विद्युत केंद्रसाठी सुपरवायझर म्हणून दहा महिने नोकरी केली. 'चंद्रपूर' इथं कष्ट करून खरेदी केलेल्या हार्मोनिअमचं नामकरण नरेंद्र चिपळूणकर व तेव्हाच्या मित्रांच्या साक्षीनं 'चंद्रिका' असं करण्यात आलं! या हार्मोनिअमचं एका वर्षातच 'काळी पाच' या स्वरात 'गंधार ट्यूनिंग' केलं गेलं आणि 'वीणाताईंची हार्मोनिअम' अशी तिची ओळख बनली!

व्यावसायिक साथ असलेला माझा पहिला कार्यक्रम म्हणजे 'दादर माटुंगा सर्कल' इथं झालेला वीणाताई यांचा कार्यक्रम! ता. १४ जुलै १९८५ रोजी तो झाला. या कार्यक्रमानं माझी व वीणाताईंची सांगीतिक कारकीर्द बहरली. वीणाताई या नात्यानं माझी आत्या (वडिलांची सख्खी मावसबहीण) त्यामुळे व आमची मनं जुळल्यामुळे मी सर्वाधिक काळ साथसंगत केलेल्या कलाकारांमध्ये वीणाताईंचा उल्लेख अटळ आहे, वीणाताईंपाठोपाठ प्रभ अत्रे, मालिनी राजूरकर, पद्मा तळवळकर, आरती अंकलीकर या गायिकांबरोबरच संजीव अभ्यंकर, राजन-साजन मिश्रा, जयतीर्थ मेवुंडी, व्यंकटेशकुमार, पंडित जितेंद्र अभिषेकी, पंडित भीमसेन जोशी अशा क्रमानं माझा सांगीतिक प्रवास बहरतच गेला. भीमसेनजींसोबत १९९५ मध्ये अमेरिकेत २१ दिवसांत १४ कार्यक्रम हा माझ्या साथसंगीताच्या प्रवासातला मी 'कळसाध्याय' समजतो. वीणाताई व संजीव यांचे असंख्य कार्यक्रम मी वाजवले असेल तरी 'हा अमुकचा संगतकार' हा शिक्का माझ्यावर कधीच बसला नाही. १५ पेक्षा जास्त कलाकारांसोबत, १३ देशांमध्ये ३० दौरे असं भाग्य मला मिळालं. हे सर्व लिहिताना एक गोष्ट नम्रतापूर्वक नमूद करावीशी वाटते ती ही, की रियाज करताना व शिक्षण घेताना डोळ्यासमोर वरील गोष्टी कधीच नव्हत्या. या क्षेत्रात आल्यानंतर आत्तापर्यंतच्या गुरूंनी सांगितलेल्या आणि कायम लक्षात ठेवलेल्या तीन गोष्टी अशा : १) पिताश्री उवाच : 'ज्या व्यक्तीला तानपुरा मिळवता येत नाही त्या व्यक्तीसोबत 'संगीत' विषयक चर्चा करू नये'. २) दिलीप गोसावी : 'पैशाच्या मागे लागलास तर पैसा पाठ दाखवेल. पैशाला पाठीमागे सोड, मग पैसा पाठ सोडणार नाही.' ३) पंडित मनोहर चिमोटे : 'संगीतक्षेत्रातल्या मूर्खांना डिवचू नये'! साथसंगतक्षेत्रात जास्तीत जास्त प्रामाणिक राहायला शिकवणारा माझा गुरू म्हणजे माझा परममित्र, सहव्यावसायिक डॉक्टर अरविंद थत्ते! 'गंधार ट्यूनिंग'ची हार्मोनिअम वापराची सवय मला अरविंदमुळे

लागली. आमच्या दोघांच्या स्वभावात काहीसा अतिरेकी भाव असतो; पण तो 'आपल्या वाद्याला कुणी नावं ठेवता काम नये', याकरिताच असतो. साधारणतः सन २०००-२००१ मध्ये मी व भरत कामतनं हैदराबादमधून चालणाऱ्या एका टीव्ही चॅनेलसाठी १२ विविध गायक/गायिकांच्या ३६ भागांसाठी साथसांगत केली. 'प्रत्येकासोबत 'गंधार ट्यूनिंग' संवादिनी वाजवायची' या माझ्या हट्टापोटी मी सहा वाद्यं हैदराबादला नेली. ज्याप्रमाणे 'प्रेम कधीही एकतर्फी होत नसतं' किंवा 'एकतर्फी प्रेमाला काही अर्थ नसतो' याच धर्तीवर वाद्यांबाबत, कलेबाबतही म्हणता येईल. तुम्ही आधी तुमच्या वाद्यांवर, कलेवर प्रेम करायला हवं मग ती वाद्यं, ती कलाही तुमच्यावर प्रेम करेलच!!

'संवादिनी कशी सांभाळायची? तिची काळजी घ्यायची?' असं मला परवा एका मुलाखतीत विचारण्यात आलं होतं. मी तत्क्षणी म्हणालो : 'लहान बाळाला आपण जसं सांभाळतो ना, तशीच सांभाळायची असते संवादिनी!' संगीतशिक्षकाची माझी कारकीर्द १९८० मध्ये सुरू झाली. निमित्त झालं ते कॉलेजमध्ये जायला लागल्यावर मी वडिलांकडं 'पॉकेटमनी' मागितला.' त्यांनी मला तत्काळ एक पत्ता दिला. तो पत्ता चतुःश्रृंगीसमोर राहणाऱ्या देशपांडे आडनावाच्या बाईंचा होता. वडील मला म्हणाले : ''आठवड्यातून एक दिवस देशपांडे बाईंना हार्मोनिअम शिकव व चाळीस रुपये फी घे'. दुसरी ट्यूशन होती थेट वानवडीत! दोन टोकांना असलेल्या या दोन्ही ठिकाणी मी त्या वेळी सायकल मारत जात असे. गेली ३८ वर्षं अव्याहतपणे अध्यापनकार्य सुरू आहे. सुरुवातीच्या चार-पाच वर्षांनंतर मी गायन सोडून फक्त संवादिनी या वाद्यावर लक्ष केंद्रित केलं आणि 'जे काही अर्थार्जन करेन ते फक्त संवादिनीच्याच माध्यमातून करेन,' असा मनाचा निश्च केला. संवादिनीशिक्षक, संगतकार, परीक्षेनुसार या वाद्याविषयीच्या पुस्तकांचं लेखन, त्याबरहुकूम सीडींची निर्मिती, इतकंच नव्हे तर या वाद्याची खरेदी/विक्री, दुरुस्ती अशी विविध कामं सुरुवातीच्या काळात मी केली. माझ्या हातून असंख्य विद्यार्थी घडण्याचं प्रमुख कारण म्हणजे, पुण्यातली 'गांधर्व महाविद्यालय' ही वास्तू. ही वास्तू मला २४ तास उपलब्ध होती. ही वास्तू मला स्वतःला रियाजासाठी, विद्यार्थ्यांसोबत शिकवताना, त्यांच्या निवासासाठी उपलब्ध झाली. मला स्वतःला रियाजाचं 'व्यसन'च असल्यानं दिवसातले १०-१२ तास स्वतः सोबतच शिष्यांकडून रियाज करून घेतला. यातून किती विद्यार्थी तयार झाले, याचा मी अजून हिशेब केला नाही. मात्र, पंडित सुरेश तळवळकर व पंडित उल्हास कशाळकर यांना आदर्श मानून पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या एक टक्का तरी कार्य हातून व्हावं, अशी मनोमन इच्छा आहे व तसा प्रयत्न मी करत आहे. विद्यार्थी घडवत असताना आपण स्वतःच घडतो आहोत, याचा साक्षात प्रत्यय मला असंख्य वेळा आला आहे. महाविद्यालयीन जीवनात संवादिनीप्रमाणेच 'रामभक्ती'चं व 'नामस्मरणा'चं वेड - हो वेडच - मला लागलं. त्यामुळे रियाज केल्यावर नामस्मरणाचा व नामस्मरण केल्यावर रियाजाचा आनंद मला मिळतो! श्रीक्षेत्र गोंदवले व महाराज हे माझं असीम श्रद्धास्थान आहे. त्यामुले गेली ३५ वर्षं अव्याहत, तसंच रामनवमीच्या दिवशी अखंड २४ तास रियाजाचा माझा संकल्प विद्यार्थ्यांच्या मदतीनं सुरू आहे. याचा माझ्या मनावर झालेला संस्कार म्हणजे, सगळं काही त्यांच्या इच्छेनं, कृपेनं होत आहे, अशी दृढ निष्ठा निर्माण झाली व त्यामुळेच हातून अनेक उत्तमोत्तम कार्य घडत गेली.

*साभार सकाळ रविवार २८ ऑक्टोबर २०१८*

♦

## वसईत पहिले कलादालन सुरू

श्री. अरुण मोरेश्वर मराठे हे मॉडेल आर्ट इन्स्टिट्यूट दादर येथील निवृत्त प्राचार्य आहेत. पेंटींग करणे हा त्यांचा व्यवसाय आहे. पारनाका वसई (प.) जि. पालघर येथे 'मराठे आर्ट गॅलरी' सुरू केली. मुंबईच्या आर्ट गॅलरीसारखे स्वरूप दिले. मराठे प्रतिष्ठान द्वारा श्री. अरुण मोरेश्वर मराठे यांचे हार्दिक अभिनंदन.

आपले कुलबांधव चित्रकार राजा मराठे, मालाड, चित्रकर्ती कुमुद डोके, ठाणे आणि ज्येष्ठ चित्रकार श्री. अरुण मराठे वसई या प्रतिभावान चित्रकार, कलावंताचा मराठे प्रतिष्ठानला अभिमान वाटतो.

**- संपादिका, 'हितगुज'**

## मौजीबंधन - व्रतबंध



चि. शार्दूल बाळकृष्ण मराठे (पृ. ५४१), गोवा

चि. शार्दुलची मुंज वैशाख शुद्ध पंचमी, गुरुवार दि. ९ मे २०१९ रोजी सकाळी १० वा. ४२ मि. फोंडा-गोवा येथे राहत्या घरी मौठ्या हौसेने थाटामाटात साजरी झाली. बटूला शुभाशिर्वाद द्यायला नातलग मंडळी अनेक हितचिंतक, मान्यवर व्यक्ती उपस्थित होत्या.


चि. शार्दूल हा विद्रान लेखक, भाषातज्ज्ञ श्री. कालिदास बाळकृष्ण मराठे यांचा नातू आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. शार्दूलला अनेक शुभाशिर्वाद.

# महादेव उपारव्य बाळूकाका मराठे

• संजय मराठे (पृ.४१६), अमरावती भ्रमणध्वनी : ९४२१७४०८९४

**बा**ळूकाकांचे महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे ला दु:खद निधन झाले. साधारणपणे लहानपणी ज्यांचे टोपण नांव बाळु किंवा बाळ असते, त्यांना मोठेपणी बाळासाहेब संबोधले जाते पण आमच्या बाळदादाला बाळूकाका/बाळूमामा संबोधले जायचे कारण आमचे सर्वच पुतणे/पुतण्या, भाचे/भाच्या त्यांच्याच अंगाखांद्यावर खेळत लहानाचे मोठे झाले. त्यामुळे घरी येणारे ही त्यांना बाळूकाका किंवा बाळूमामा म्हणायचे त्यामुळे घरचे सगळे त्यांना बाळूकाका म्हणतात.



बाळूकाका एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व. आमच्या लहानपणी कुळाचाराच्या दिवशी अगदी सोवळे नेसून आईला स्वयंपाकात मदत करण्यापासुन ते वेटाळातील कुणाला देवाज्ञा झाली तर त्याला खांदा देण्यापर्यंत सर्वच कामात त्यांचा पुढाकार असे.

कुटुंबातील कोणी आजारी पडला आणि दवाखान्यात दाखल करण्यात आले तर दवाखान्यात रात्री मुक्काम त्याचाच असे.

त्यांची आधीची नोकरी केंद्र सरकारच्या विज्ञान मंदिर मध्ये. त्या मार्फत ते छोट्या छोट्या गावातून पशु पक्षी, पर्यावरण आणि इतर सामान्य विज्ञानाच्या माहितीचा प्रचार आणि प्रसार करित. हा विभाग बंद झाल्यावर राज्यशासनाच्या सेवेत त्यांची बदली झाली. त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार त्यांची शिक्षण विभागात बदली करण्यात आली. पुढील सर्व नोकरी त्यांनी हायर एज्युकेशन विभागात केली आणि शेवटी हायर एज्युकेशनच्या पे युनिट विभागातुन अधिक्षक पदावरुन सेवानिवृत्त झाले. नोकरीत रूजु झाले तेव्हा ते मॅट्रिक होते पण नोकरी सांभाळून त्यांनी एम.ए. (इतिहास) बी.एड्. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले.

सामाजिक कार्यातही त्यांचे महत्त्व पुर्ण योगदान राहिले आहे. अमरावती नगर वाचनालयाचे ते सुमारे चाळीस वर्षे सहसचिव होते. वाचनालयाच्या व्याख्यान मालेतही त्याचा मोलाचा वाटा असे. त्यामुळे अनेक साहित्यिक आमच्या घरी येवून गेलेत. बाळूकाकामुळेच ह.मो. मराठे, राम शेवाळकरसारख्या मोठ्या लोकांशी माझा परिचय झाला. अशा लोकांसोबत भोजनाचा आनंद घेता आला. पत्रकारितेत ही त्यांची रुची होती. दै. हिंदुस्थानचे संपादक डॉ. अरुणदादा त्यांचे खास मित्र. दै. हिंदुस्थान कार्यालयात अरुणदादांच्या निवडक मित्रमंडळीत रोजच्या बैठकीत बाळूकाका ही असत. नाट्य दिग्दर्शक माणिक कानेड, डी.जी. अनगळ, ललीत देशमुख, शंकर भावे हा त्याचा मित्र परिवार. बऱ्याच क्षेत्रातील व्यक्ती त्याच्या मित्र परिवारात होत्या. बाळूकाका पाशी जुन्या काळातील आठवणींचा जणु खजिनाच होता. मी जेव्हा आमच्या वडिलां वर पुस्तक लिहिले तेव्हा त्यांनी मला खूप माहिती सांगितली.

बाळूकाकांना बातम्यांची फार आवड. सेवानिवृत्तीनंतर त्यांचा बहुतेक वेळ बातम्या ऐकण्यात जाई. वाचनाची ही प्रचंड आवड. वाचनालयात जाणे बंद केल्यावर त्यांचा आवडता छंद म्हणजे रेडिओ ऐकणे. त्यातही विशेष आवड विविध भारती वरील सिने संगीत. टी.व्ही. वर जुनी गाणी लागली की त्यातील नट नट्यांची नावे आणि माहिती ते आम्हाला सांगायचे.

आमच्या रामदरबारचे ते खास सांभाळ कर्ते. घरच्या सर्वच लग्नात ते घरी राहून घर साभाळायची जबाबदारी आनंदाने पार पाडत. बाळूकाकांची राजकीय विचारसरणी काँग्रेसची, आवडते राजकीय नेते महात्मा गांधी. बाळूकाकांना शास्त्रीय संगीत आणि नाटकांची आवड होती. त्यांनी एकांकिकेत केलेल्या काही भुमिका अजुनही माझ्या आठवणीत आहेत.

बाळूकाकांना पर्यटनाचीही खुप आवड होती. भाचा मोहन गद्रे बरोबर त्यांनी खुप भ्रमंती केली. सर्व ज्योतिर्लिंगे बघीतली. चारधाम यात्रेत आम्हीही त्यांच्या सोबत होतो. मोहन सोबत दक्षिण भारतातील अनेक स्थळांना ही त्यांनी भेटी दिल्या.

त्यांची आवडती जागा म्हणजे आमच्या वाड्यातील त्यांच्या खोली समोरील कमानी मधील झोपाळा.

आवडता रंग – पांढरा, आवडती नटी – हेमामालिनी, आवडता नेता – इंदिरा गांधी, आवडता खाद्यपदार्थ – काठेवाडी पेढा, वृधापकाळातील विरंगुळा – रेडिओ

अशा ह्या हरहुन्नरी अविवाहित बाळूकाकांची एकच इच्छा होती की आपले कुणालाही काही करावे लागू नये. आणि व ईश्वरानेही त्यांचे ऐकले.

आमच्या सर्वांच्या सोबत त्यांनी रात्री जेवण केले, आम्ही सर्वजण टी.व्ही. बघत होतो. बघता बघता झोपाळ्याच्या खुर्चीतुन खाली घसरले. आणि अर्धांग वायुंचा झटका आला. लगेच हॉस्पिटलमध्ये दाखल केले. आय.सी.यु. मध्ये भरती केले आणि तिथुनच एकविसाव्या दिवशी बाहेर आले ते स्वर्गरथातून देवाकडे जाण्यासाठीच. ♦


# माझा छोटासा प्रवास...

• प्राची हेमंत मराठे (पृ. १८), नालासोपारा भ्रमणध्वनी : ९७३०७४६३३६/६२८२४२५०४५

दहावीची परीक्षा संपली, निकाल लागला. सगळ्यांप्रमाणे माझ्याही पुढे प्रश्न आता पुढे काय? सगळे विषय तसे आवडीचेच होते आणि दहावीत मार्क्सही उत्तम होते. महाराजांचा इतिहास तर इतका तोंडपाठ की झोपेतून उठवून जरी विचारलं तरी सांगता येईल खानाची गोष्ट. भटकंतीची हौस असल्याने भूगोल विषयही आवडीचा. पण आकाशात उंच भरारी घेण्याची प्रबळ इच्छा कुठेतरी मनाला खुणावत होती. विमान उडवण्याची इच्छा होती. काहीतरी वेगळं करायचं होतं, काहीतरी युनिक. ठरलं मग आणि घेतला सायन्स ला प्रवेश. मार्क्स चांगले असूनही हवं होतं त्या महाविद्यालयात प्रवेश मिळालाच नाही. मन रमत नव्हतं, शाळेची सारखी आठवण यायची. मराठी माध्यमातून शिकूनही इंग्रजीचा काही त्रास झाला नाही. मेडिकल किंवा इंजिनीरिंगला ॲडमिशन घ्यायचं नाही हे आधीच ठरवलं होतं. कोणत्याही क्लासेसला जायचं नाही हा पक्का निर्धार. आई-बाबांनी कधीच कसलाच आग्रह केला नाही त्यामुळे कसलंच ओझं वाटलं नाही. मी जसा अभ्यास करायचे तसाच त्यांनी करू दिला. काही अडले तर त्यानां विचारायचे, कोणताही विषय असो ते समजवायचे आणि मला ते कळायचेही. बाबांच्या आवडीचा विषय भौतिकशास्त्र आणि मला मात्र प्राण्यांची आवड.

बारावी नंतर इच्छेप्रमाणे डी.जी. रुपारेल कॉलेजला ॲडमिशन मिळवली. बाबांनी सुरुवातीपासूनच कधीही कुठे हात धरून नेलं नाही. ते योग्य ती दिशा आणि वाट दाखवणार आणि मी त्या वाटेवर अचूक चालणार असे ठरलेले. त्यामुळे महाविद्यालयातील प्रवेश वगैरे मी एकटीनेच जाऊन सगळं केलं होतं. स्वावलंबी राहण्याचे बाबांनी दिलेले धडे मला आजही क्षणोक्षणी उपयोगी पडतात. प्रवेश घेताना आईने कॉलेजचे प्रॉस्पेक्टस पहिले आणि त्यात मेडल्स घेतानाचे विद्यार्थ्यांचे फोटोज पाहिले, म्हणाली तुलाही असच मेडल मिळायला हवं. मग काय फायनल इयरला डिपार्टमेंटमधून पहिली येऊन गोल्ड मेडल पटकावलं. बक्षीस घ्यायला मी नव्हते मुंबईत म्हणून बाबा गेले होते स्टेजवर. बाबांना अभिमान वाटावा असं काहीतरी केलं म्हणून माझा आनंद ओसंडून वाहत होता. बघता बघता तीन वर्ष कशी गेली समजलीच नाहीत. या काळात माझा डान्स क्लास मात्र नियमित सुरू होता. कोणतीही परीक्षा असो की काही असो, डान्स क्लासला सुट्टी नाही. शिकायचं आणि शिकवायचं असं दोन्ही एकत्र सुरू होतं त्यामुळे माझा पॉकेट मनी सुद्धा आपोआप निघत होता. दरम्यान कॉलेजच्या माझ्यासारख्याच भटक्या सवंगड्यांसोबत जंगलात फिरून फोटो काढणं, ट्रेकिंगला जाणं हे नियमित सुरू होतंच. रुपारेलचे दिवस संपले आता पुढे काय? दोन पर्याय, जंगल किंवा समुद्र, काहीही झालं तरी प्राणी सोडायचे नाहीत.

आता मात्र वेध लागले ते मुंबईच्या बाहेर जाण्याचे. तीन विद्यापीठांमध्ये प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरले आणि परीक्षाही दिली पण प्रवेश मिळाले नाही. निराश होऊन मुंबई विद्यापीठाचा फॉर्म भरला. पण अचानक एक दिवस मला फोन आला आणि असं समजलं की पाँडिचेरी युनिव्हर्सिटीला परत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. मी लगेच तिकडच्या डिपार्टमेंट हेड ना फोन करून फोनवरच माझा प्रवेश निश्चित करून घेतला. M.Sc. in Marine Biology, पाँडिचेरी युनिव्हर्सिटी, अंदमान कॅम्पस. मला खात्री होती की आई - बाबा कधीच नाही म्हणणार नाहीत तिथे जायला. अपेक्षेप्रमाणे त्यांनी होकार दर्शवला. त्यांनी फक्त एकच प्रश्न विचारला की दोन वर्ष एकटं राहावं लागेल, मधेच सोडून येता येणार नाही, चालेल? मी हो म्हटलं आणि बाबा खुश झाले. आई बाबा, काका काकू, नितीन सर आणि उदय दादा सगळ्यांच्या मदतीने मी अर्ध्या दिवसात संपूर्ण तयारीनिशी



बाबांबरोबर अंदमानला पोहोचले.

पहिलाच विमान प्रवास आणि पहिल्यांदाच घरापासून लांब राहण्याची संधी असा मस्त योग जुळून आला होता. हिरव्या निळ्या रंगाच्या छटा असलेले ते समुद्राचे पाणी आणि मधोमध असलेली ती हिरवीगार अंदमानची बेटं, हे सर्व विमानातून पाहून माझं मन भारावून गेलं. निसर्गाच्या इतक्या जवळ राहायला मिळणार याचा फार आनंद झाला होता. एक नवीन पर्व सुरू झालं होतं. पंखात अचानक बळ आलं होतं. सगळ्यांपासून दूर निसर्गाच्या कुशीतला माझा प्रवास आता सुरू झाला होता. नवी जागा, नवे लोक, हॉस्टेल, तिथलं जेवण, तो भात आणि सांबार, त्या तूप न लावलेल्या पोळ्या आणि बरंच काही. हळू हळू मी रमत गेले, सवय व्हायला लागली मला तिथली. मुंबई पेक्षा खूप वेगळं होतं अंदमान. मुंबई पेक्षा दहा वर्ष मागे. एक वेगळीच जादू होती त्या जागेत, एक वेगळीच नशा होती त्या हवेत, शांतता होती तिथल्या किनाऱ्यांवर, लोकांना स्वतःसाठी आणि इतरांसाठी वेळ होता. चोवीस तास घड्याळाच्या पुढे धावणारी माझी बुलेट ट्रेन तिथे गेल्यावर मात्र पॅसेंजर ट्रेन झाली होती. तिथली माणसं अत्यंत नि:स्वार्थी आणि सतत मदतीसाठी तत्पर अशी. त्यांना भेटल्यावर माणुसकी शिल्लक असल्याची सुखद जाणीव झाली आणि समाधान वाटलं. भारताचे दाक्षिणात्य टोक हे कन्याकुमारी नसून ग्रेट निकोबारचे इंदिरा पॉईंट आहे हे तिथे गेल्यावर कळलं. काश्मीर ते इंदिरा पॉईंटचे सगळे लोक आमच्या कॅम्पसमध्ये होते त्यामुळे वेगवेगळ्या संस्कृतींची ओळख झाली. मुळात मुंबईची असल्याने मिळून मिसळून राहणं कठीण गेलं नाही. एकटं राहिल्याने खूप काही शिकायला मिळाले. माणूस ओळखायला शिकले. नेटवर्कचा प्रॉब्लेम असल्याने घरी कमी बोलणं व्हायचं. पण आई बाबांचा पूर्ण विश्वास आणि सपोर्ट असल्यामुळे काहीच अवघड वाटलं नाही. एरव्ही तशी फोनची गरज लागलीच नाही कारण लेक्चर्स आणि प्रॅक्टिकल्स व्यतिरिक्त इतर वेळ समुद्रात जायचा. पाण्याखालचे ते रंगीबेरंगी विश्व स्वतःच्या डोळ्यांनी पाहताना सगळं कसं स्वप्नवत वाटायचं. स्नॉर्केलिंग करताना आलेले अनुभव शब्दात सांगण्यासारखे नाही, ते फक्त अनुभवायचे. अत्यंत आकर्षक असे कोरल्स आणि त्यात राहणारे इतर ना ना तऱ्हेचे प्राणी, वनस्पती ह्यांना पाहून मन अचंबित व्हायचे. माणसाला असलेले गोऱ्या रंगाचे कौतुक आणि गर्व ह्या मुक्या जीवांना पाहून आपोआप उतरेल. आजही माणूस स्वतःला निसर्गपेक्षा महान समजतो हे अत्यंत दुर्दैवी सत्य आहे. निसर्ग किती नि:स्वार्थी आणि सुंदर आहे हे तिथे गेल्यावर आणि त्याच्या सानिध्यात राहिल्यावर जाणवतं. दोन वर्षात तीन वेळा भूकंप आणि एकदा वादळ (वर्धा सायक्लोन) अनुभवायला मिळाले. सायक्लॉनच्या वेळी एक आठवडा प्रवाह खंडित झाला होता, नेटवर्क नव्हतं, पाण्याचा गोंधळ आणि त्यात तुफान वाहणारे वारे. पण सगळं एन्जॉय केलं. चांगले वाईट असे सगळेच अनुभव आले आणि त्या अनुभवातून शिकून मी M.Sc. ची डिग्री घेऊन परत मुंबईला परतले.

मग सहा महिने घरीच होते. नोकरी आणि Ph.D. दोन्ही साठी प्रयत्न सुरू होते. मुलींची संख्या तशी कमीच असणारे हे क्षेत्र असल्याने नोकरीच्या मुलाखतीच्या वेळीच्या वेळी असेच काही प्रश्न विचारले गेले. फिल्डवर्क जमेल कां, घरापासून लांब राहाल कां, शिपवर राहायला जमेल कां आणि बरंच काही. सगळ्याचे मिळून एकच उत्तर दिले; मी दोन वर्ष घरापासून लांब अंदमानला होते. रोज समुद्रावर जायचे, नेटवर्कचा प्रॉब्लेम तिथेही जास्त आहे त्यामुळे मला वाटत नाही की मला हे सर्व कठीण जाईल. झाले तर, मिळाली नोकरी कोचीनला Centre for Marine Living Resources and Ecology, Ministry of Earth Sciences, Government of India मध्ये प्रोजेक्ट असिस्टंट या पदा वर मी रुजू झाले. आमच्या क्षेत्रात M.Sc हे बेसिक क्वालिफिकेशन असल्याने ऑफिस मध्ये सगळ्यात जुनिअर आणि लहान मीच. बॅग्स भरल्या आणि डिसेंबर २०१७ ला ट्रेन ने मी कोचीन गाठलं. चार दिवस हॉस्टेल मधे राहिले आणि तोपर्यंत एक मस्त फ्लॅट शोधला आणि तिथे राहायला लागले. एका महिन्यातच शिपवर जाण्याची संधी मिळाली. FORV सागर संपदा, भारतातील एकमेव फिशरीज रिसर्च व्हेसल. संपूर्ण २०१८ मध्ये साधारण १५० दिवस शिपवर होते. मान्सून असो की सायक्लॉन, सगळ्या कठीण वातावरणात कसं राहायचं आणि सगळ्या परिस्थितीला कसं तोंड द्यायचं हे शिकले. जेवण, पाणी संपत आल्यावर कसं निभावून न्यायचं हे समजलं. समुद्र कितीही खवळलेला असला तरी कामं थांबता नये असा आदेश असायचा. समुद्राचा आणि सतत हलणाऱ्या जहाजाचा त्रास कधी जाणवलाच नाही उलट मी कायम खवळलेला समुद्र एन्जॉय केला. चोवीस तास शिप वर कामं करावी लागायची पण कधीच त्रास झाला नाही कारण काम माझ्या आवडीचं होतं. ५ ते ६ मीटर उंच लाटा यायच्या आणि ताशी ४० ते ५० नॉट्स वेगाने वारे वाहायचे पण काहीही झाले तरी voyage यशस्वीरीत्या पूर्ण करूनच आम्ही परत यायचो. केरळ मध्ये राहताना भाषेचा खूप गोंधळ होतो. तिकडे हिंदी किंवा इंग्रजी कळत नाही आणि मला मल्याळम बोलता येत नाही त्यामुळे काहीही घ्यायचे म्हटले तर फोटो दाखवावे लागतात अथवा साइन लँग्वेज मधे बोलावे लागते. असो, गंमत आहे त्यात पण. थोडं फार मल्याळम शिकले त्यामुळे आता तितका त्रास होत नाही. हल्लीच एका इंटरनॅशनल कॉन्फरन्स

मध्ये माझं काम प्रेझेंट करण्याची संधी मला मिळाली तसेच आता ऑफिसच्या कामासोबत Ph.D. चे कामही सुरू केले आहे. भविष्यात आर्क्टिक आणि अंटार्क्टिकवर जायचे आहे. संवर्धनाशी निगडित काम करण्याची माझी मनापासून इच्छा आहे जेणेकरून लोकांना समुद्राच्या महानतेची जाणीव होईल, मग हळू हळू लोकं बदलतील आणि आपला मुंबईचा समुद्रही परत सुंदर होईल.

(अंदमानला असताना लोकांनी विचारलेल्या मजेदार प्रश्नांची उत्तरे: अंदमान भारतातच भाग असल्याने तिथे जाण्यासाठी पासपोर्ट अथवा व्हिसा लागत नाही.

अंदमानची लोकं आपल्यासारखीच आहेत आणि ते कपडे घालतात. आपल्या सारखे जेवतात आणि हिंदी सुद्धा बोलतात.

अंदमानचे ट्राइब्स (आदिवासी लोक) इतर माणसांसोबत राहत नाहीत. जोपर्यंत आपण त्यांच्या हद्दीत जात नाही किंवा त्यांना त्रास देत नाही तोपर्यंत ते आपल्याला काहीही करत नाहीत.

अंदमानचे पाणी काळे नाही तर ते निळेशार आहे.

अंदमानला जाणे म्हणजे आता शिक्षा नव्हे तर सुवर्णसंधीच आहे.

मराठी माणसासाठी अभिमानाची गोष्ट आहे की अंदमानचा इतिहास हा सावरकरांनी रचला आहे आणि अंदमानच्या एअरपोर्टला ही सावरकरांचे नाव आहे.

तिथले लोक सावरकरांना 'वीर सावरकर' असे संबोधतात.

शेवटी एकच सांगते, समुद्रावर प्रेम करा, त्यात कचरा करू नका. घरच्या कचऱ्याची विल्हेवाट स्वतः लावा. प्लास्टिकचा वापर ९९% बंद करा. प्लास्टिक स्ट्रॉ, इअर बड्स, युज अँड थ्रो प्लास्टिकच्या वस्तू, थर्माकॉल यांचा वापर पूर्णपणे बंद करा आणि हो आयुष्यात एकदातरी अंदमानला भेट द्या. सेल्ल्युलर जेल बघा; आजही सावरकर तिथे असल्याचा भास तुम्हाला नक्कीच होईल. ♦

प्रकाशझोत

# खारीचा वाटा उचलणारे पर्यावरण संरक्षक

## – श्री ओंकार नरेंद्र मराठे (बडोदे, गुजरात)

'हिरवे हिरवे गार गालिचे' ही लहानपणी शाळेत असताना गायलेली कविता... आता मात्र असे गालिचे खूपच कमी बघायला मिळतात. 'गोल्बल वार्मिंग'चा परिणाम आणि समाजाची निसर्ग संवर्धन व संरक्षण याबाबतीत असणारी उदासीनता, प्लास्टिक चा गैरवापर, अति वापर हेच यास कारणीभूत आहेत.



पण पर्यावरण संरक्षणात खारीचा वाटा उचलणारे बडोद्याचे श्री ओंकार नरेंद्र मराठे एक मोलाचे कार्य करीत आहेत. Greenshield Biotech या कंपनी साठी ते काम करीत आहेत. ही कंपनी कचरा पेटीत कचरा गोळा करण्यासाठी ठेवण्यात येणाऱ्या पिशव्या व काही कटलरी वस्तू बनविते. आता तुम्ही म्हणाल यात नवं ते काय किंवा सांगण्यासारखे असे काय? तर मित्रहो, या ज्या पिशव्या, कटलरी तयार केल्या जातात त्यांना Biodegradable products असं म्हटलं जातं. कारण या पिशव्या बनविण्यासाठी जे मटीरियल वापरले जाते ते पेट्रोलियम आधारित प्लास्टिक असतं ज्यात काही सेंद्रिय घटक असतात जे या पिशव्यांना Biodegradable बनवितात. म्हणजे जेव्हा या पिशव्या कचऱ्यासोबत मातीच्या ढिगाऱ्या वर फेकल्या जातील किंवा कुठेही त्यांचा संपर्क जमिनीशी येईल तेव्हा त्यांचे रूपांतरण होण्यास सुरुवात होते व हळू हळू त्या जमिनीशी एकरूप होतात व मातीत मिसळून जातात. याचाच अर्थ या पिशव्यांपासून पासून निसर्गाला अजिबात धोका नाही. याचे ३० नगांचा एक असे रोल मिळतात. आपण 'पिज्झा हट' मधे अगदी सहजच ५००-६०० रुपयांच्या पिज्झा ची लज्जत घेतो. पण खूपच कमी किमतीत मिळणाऱ्या या पिशव्या जर सर्वांनी वापरल्या तर पर्यावरण संरक्षण करण्यात सगळ्यांचीच मदत होईल आणि निसर्गाच्या अवर्णनीय सौंदर्याची लज्जत आपण घेऊ शकू.

श्री ओंकार मराठे आपल्या परीने हे अनमोल कार्य करीत आहेत. चला तर आपण ही या पिशव्या विकत घेऊन त्यांच्या या कार्यात सहभागी होऊया.

*संपर्कासाठी: श्री ओंकार नरेंद्र मराठे*
*इमेल आयडी: greenshieldbiotech@gmail.com*
*संपर्क: 9909953585*






# स्वप्न

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०), वडाळा दूरध्वनी – ०२२ २४१५०८८९

संध्याकाळचे सहा वाजले. शिपायाने शाळा सुटल्याची घंटा घणघणवली. त्यासरशी तुरुंगातले कैदी सुटावे त्याप्रमाणे शाळेतील मुले दाटीवाटीने गर्दीने बाहेर पडू लागली. शाळेच्या आवारातून कधी एकदाचे बाहेर पडतो आहोत असे त्यांना झाले होते. शाळेत वर्गात असल्यावर 'मुकी बिचारी कुणी हाका' असा जो केविलवाणा भाव मुलांच्या चेहेऱ्यावर तरळताना दिसतो तो आता शाळेतून बाहेर पडताना अजिबात दिसत नव्हता. उलट सिनेमातल्या हिरोप्रमाणे व्हीलनशी मारामारी करून छाती पुढे काढून, विजयी मुद्रेने मोठ्या ऐटीत ती मिरविताना दिसत होती.

मी माझ्या कपाटात निबंधाच्या वह्या ठेवल्या. कुलूप लावले आणि पर्स घेऊन लगबगीने घरी जायला निघाले. इतक्यात, 'बाई' म्हणून कानावर हाक पडली. मी हाकेच्या दिशेने पाहिले तर एक बाई दबकत दबकत माझ्या पुढ्यात येऊन उभी राहिली. माझ्या चाणाक्ष नजरेने ती पालक असल्याचे जाणले.

''नमस्ते बाई!'' मीही हसून नमस्कार केला.

''घरी जायची घाई असेल ना?'' तिने विचारले.

''हो, मुलं शाळेतून घरी येतात त्यांना चहा, खायला द्यायचे असते. शिवाय रात्रीच्या स्वयंपाकाची तयारी लगेच करावी लागते. गृहिणीला काय कामे सतराशे साठ...''

''नोकरी आणि घरकाम यामुळे तुमची जास्तच ओढाताण होत असेल नाही? मला तुमचे कवतिक वाटते. शाळा सांभाळून घरातीलही सर्व कामे तुम्ही व्यवस्थित करता. ...कसं जमतं हो तुम्हाला?''

''ते राहू दे, माझ्याकडे काय काम होतं तुझं?'' मी हसून मुद्यालाच हात घातला. ती म्हणाली, ''माझा मुलगा दिलीप ८वीत 'क' तुकडीत आहे. त्याला ओळखता तुम्ही? अभ्यास कसा करतो तो?''

मी आठवायला लागले, एकेक चेहरे डोळ्यापुढे येऊ लागले. ती म्हणाली, 'काळासावळा, अपऱ्या नाकाचा, कुरळ्या केसांचा पण स्मार्ट आहे.''

मी म्हटले, ''एकेका वर्गात सत्तर सत्तर मुले असतात. मला चटकन डोळ्यापुढे येत नाही तुझा मुलगा....''

का कोण जाणे, एक प्रकारचा ओशाळलेपणाचा भाव माझ्या चेहऱ्यावर तरळला असावा. ती लगेच म्हणाली, ''असू दे, असू दे, मी उद्याच या वक्ताला त्याला घेऊन येईन तुमच्यापाशी मंग झालं? तुमचा येळ मोडला म्हणून माफी मागते बाई...''

''राहू दे ग, त्यात काय एवढं? उद्या शाळा सुटल्यावर घेऊन ये त्याला. आणि हो, तुझं नाव विचारायचंच राहिलं, नाव काय ग तुझं?''

''सावित्री!'' नवऱ्याचं नाव घेताना लाजावी तशी ती लाजली.

मी घरी जायला निघाले. रस्त्यात तिच्याच मुलाचा विचार मन करू लागले. हुशार, तरतरीत, स्कॉलर, देखणी मुलं लक्षात राहतात आणि दिलीप तसा 'कोणी' नसल्याने लक्षात राहू नये आपल्या? हे चूक आहे. शाळेतील सर्व मुलांना आपण सारखे शिकवितो, सर्वांना समान वागणूक देतो, तरी असे का व्हावे? ते काही नाही, उद्या ८वी 'क'वर शिकविताना दिलीपची ओळख करून घ्यायची असे मी मनाशी ठरविले.

...दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणेच शाळेत गेले. टाईम-टेबल पाहिले तर ८वी 'क'वर माझा तास नेमका नव्हता.

संध्याकाळी शाळा सुटली. घरी जायची घाई होती. तरीही मी रेंगाळत राहिले. वाटलं सावित्री, तिच्या मुलाला, दिलीपला घेऊन मला भेटायला येईल.

...पण त्यादिवशी ती काही आली नाही. नकळत माझे मन तिचा विचार करू लागले. आज ती भेटावी असे वाटू लागले. तिच्या विषयी एक प्रकारचे कुतूहल वाटू लागले. कपाळावर ठसठशीत मोठे लाल कुंकू, गळ्यात घट्ट असे मंगळसूत्र, हातभर हिरव्या बांगड्यांचा चुडा, हसतमुख, शेलाट्या बांध्याची सावित्री माझ्या लक्षात राहिली. पण त्याहीपेक्षा माझ्या मनाला भावले ते तिचे स्वप्नाळू डोळे, तिच्या डोळ्यात स्वप्न पाहाण्याची सवय असावी. स्वप्नाळू, भावूक, तरळ संवेदना व्यक्त करणारे असे तिचे डोळे होते. ती जे बोलायची त्यातील भाव सहजपणे तिच्या डोळ्यातून प्रतीत व्हायचा. एरव्ही क्वचितच दिसणारे असे तिच्या पापण्यांना लांब, दाट केस होते. फुलपाखरांनी फडफड करावी तशी तिच्या पापण्यांची उघडझाप होई. तिच्या अशा बोलक्या भावपूर्ण डोळ्यांनी माझ्या मनाचा ठाव घेतला.

...दिलीपबद्दल, तिच्या मुलाविषयी तिला काही प्रॉब्लेम असेल का? अनेक पालक मुलांच्या तक्रारी घेऊन येतात, तशीच हिचीही काही तक्रार असेल का? दिलीप तिला छळत असेल का? दूरदर्शनवर जाहिराती मागून जाहिराती येत राहाव्यात तशा एका मागोमाग एक अनेक शंका मनात येऊ लागल्या.

...आज नेहमीप्रमाणे शाळा सुटली. घरी जायला निघणार

तोच शिपायी कोणाला तरी दरडावत होता, पाठोपाठ मला बाईंना भेटायचे आहे, असे सावित्री शिपायाला सांगताना दिसली. मी लगेचच पुढे आले.

''नमस्कार बाई!'' मी भेटल्याचे प्रसन्न भाव तिच्या डोळ्यात तरळले.

''नमस्कार, मी दिलीपशी ओळख करून घेतली. परवा तास होता त्याच्या वर्गावर तेव्हा लक्षात ठेवले.''

''ते झ्याक झालं बाई – छान झालं. माझ्या दिलीपवर लक्ष ठेवा. तो अभ्यास करतो की नाही? शाळेत तासाला दांडी मारतो का? उनाड पोरांच्या संगतीला लागलाना तर चांगला फोडून काढीन मी. मला त्याला खूप शिकवायचं आहे. मोठ्ठं करायचं आहे. कर्तासवरता, शहाणा बनवायचं आहे. आम्ही शिकलो नाही, गरीब परिस्थितीमुळे आम्हाला शिक्षण अर्धवटच सोडावे लागले. आमच्यावानी दिलीपच्या आयुष्याची बरबादी नको व्हायला. बरोबर की नाही बाई?''

...तिचे डोळे चमकत होते. एक प्रकारचा आवेश तिच्या बोलण्यात होता. मला तिच्यातील तडफदार आई बघून जिजामातेची आठवण झाली. मी भानावर येत म्हटले, ''बरोबर विचार करतेस तू. माझे लक्ष राहील तुझ्या मुलाकडे. तो बिघडणार नाही आणि अभ्यास करील याची काळजी आपण घेऊ. मग तर झाले? तू निश्चिंत राहा'' असा दिलासा मी दिला.

...भाजीवालीने भाजीची पाटी खाली ठेवल्यावर सुस्कारा टाकत हुऽऽश करावं तसं तिला माझ्याशी बोलण्याने हलकं वाटलं असावं. समाधानी चेहेऱ्याने तिने माझा निरोप घेतला.

...शाळेच्या विविध उपक्रमांत व्यग्र असतानाही, मी दिलीपवर लक्ष ठेवून असायची. सावित्रीच्या वेगळेपणामुळे दिलीप विषयी एक प्रकारची आत्मीयता वाटू लागली होती. माझ्या सहाध्यायींनाही दिलीपविषयी मी बोलले होते. अभ्यासात त्याची फार प्रगती नव्हती. सुमार बुद्धीचाच तो होता. पण वागण्यात–बोलण्यात नम्र होता. वाह्यात मुलांच्या नादी लागला नव्हता. सर्व तासांना तो हजेरी लावायचा. गणित–विज्ञान विषयांत तो हमखास नापास व्हायचा. बरेचदा प्रगती पुस्तकावर 'कच्चा' हा शेरा ठरलेला!

समुद्राच्या पाण्यात पायाखालची रेती जितक्या सहजतेने सरकते तसे दिवस सरत होते. अशाच एका रविवारी दारावरची बेल वाजली. मी दार उघडले. दारात सावित्री उभी. घामाघुम झालेली.

''येऊ का बाई? तुम्हाला अगूदर न कळविता अचानक आले, पण काय करू? मला राहावलेच नाही, पाण्याबाहेर काढलेल्या माशाविना मन तळमळत होते. मला तुमच्याशी मोकळेधाक बोलायचे आहे.''

...मी तिला बसायला सांगितले आणि फ्रीजमधले गार पाणी प्यायला दिले. तिने एका दमात पाण्याचा ग्लास खाली केला. मी, 'अजून हवे का पाणी?'' विचारले. तिने खुणेनेच नकारार्थी मान हलविली.

''बाई जरा बसा. मला पुष्कळ सांगायचं आहे तुमच्यापाशी. मी बाईमाणूस. मोलकरणीची कामे करते आणि पैसे कमावते. माझा नवरा व्यसनी. दारूबाज. आमच्या वस्तीत सारे त्याला 'बेवडा' म्हणून ओळखतात. व्यसनापायी नोकरी गमावून बसला. लहर लागली तर काम करतो नाही तर ढोसून पडतो मेल्यावानी. मागे बघा, सरकारची फॅमिली प्लॅनिंगची मोहिम आली होती, तेव्हाच मी ऑपरेशन करून टाकले. त्याबद्दल मला पैसेही मिळाले. नवरा नाराज झाला. बऱ्याच पोरांचा बाप व्हायचे होते त्याला. तोच काय तो पराक्रम! पण मी त्याला त्यावेळी स्पष्ट बजावले, ठणकावूनच सांगितले म्हणा, एकुलत्या एक मुलाला, दिलीपला पोटापुरते खायला घालायला तुला जमत नाही. मी मोलकरीण बनून माझ्या पैशाने खाते आणि तुलाही खायला घालते. मला एकच मुलगा बास. त्याला पुढे चांगले शिकवीन. डॉक्टर, वकील, मामलेदार, कलेक्टर, चांगला ऑफीसर त्याला बनवूनच दाखवीन. नाही तर नावाची सावित्री नाही मी! नवऱ्याच्या दुर्गुणांची सावली त्याच्यावर पडू नये म्हणून माझे काळीज फाटते. त्याच्यावर तुम्हा लोकांसारखे चांगले संस्कार व्हायला हवेत. म्हणून मी त्याला फार जपते. चांगल्या सवयी लावून त्याला वाढविताना मला कष्ट पडतात. पण मी ते आनंदाने करते. हाताचा पाळणा करून मी त्याला लहानाचा मोठा केला आहे. परवडत नसतानाही वेळप्रसंगी पोटाला चिमटा लावून, त्याला पैसे देऊन शिकवणी लावली. महागडा स्पेशल ट्यूशन क्लास गणितासाठी लावला, का तर तो पास व्हावा. त्याचे वर्ष फुकट जाऊ नये हीच कळकळ. त्याने खूप शिकावे, नाव काढावे हीच माझी प्रबळ इच्छा आहे. दुसरी कोणत्याच गोष्टीची, सुखाची मला हाव नाही बाई!''

...पाण्याचा नळ सुटावा तशी सावित्री बोलतच राहिली. मीही तिला मध्येच अडविले नाही. चहा पिता पिता मी तिच्या चेहेऱ्याकडे पाहात होते. एका विलक्षण जिद्दीचे, कर्तबगारीचे तेज तिच्या चेहेऱ्यावर विलसत होते.

... आणि तिचे तेच ते स्वप्नाळू डोळे! ...जणु काही तिचा दिलीप डॉक्टर किंवा वकील झालेला तिच्या डोळ्यांना दिसत होता. तिच्या महत्त्वाकांक्षेला पंख फुटले होते.

...काही क्षण शांततेत गेले. मला म्हणाली, ''तुम्हाला कधी मदत लागली तर हक्काने बोलवा मला. तुमच्यासारख्या चांगल्या माणसांची कामं करायला आवडेल मला.'' 'बरं' म्हणून मी मान डोलाविली. जाता जाता, 'दिलीपच्या अभ्यासाकडे ध्यान द्या', सांगायला ती विसरली नाही.

दिवस भराभर जात होते. पौष संपून हेमंताच्या थंडीचा कडाका कधी मागे पडला ते समजलेच नाही. वसंताच्या आगमनाची चाहूल कोकिळेच्या कूजनाने दिली. मोहोर फुटून आंब्याचे झाड लखलखले. मोगरा घमघमला. चैत्राला सुरुवात झाली. वर्षप्रतिपदा आली. वार्षिक परीक्षांचा मोसम सुरू झाला. अभ्यासाचा हंगाम आला. उनाड विद्यार्थीही अभ्यासाच्या खटापटी करू लागले. आम्ही सर्व शिक्षक 'पोर्शन्स' पुरे करण्याच्या घाईत होतो. तरीही बऱ्याच दिवसात सावित्री मला भेटायला शाळेत किंवा घरी आली नाही याची मनाला रूखरूख लागली. म्हणून त्यादिवशी दिलीपच्या वर्गावरचा तास आटोपल्यावर, दिलीपला शाळा सुटल्यावर 'मला भेट' म्हणून सांगितले. आज्ञाधारक मुलाप्रमाणे दिलीप मला भेटायला आला. त्याच्याकडे आईची, सावित्रीची विचारपूस केली. तेव्हा त्याने सांगितले, 'आईची तब्येत बरी नव्हती. आजारी पडली होती ती. मला चांगले शिकता यावे, महागडी पुस्तके-वह्या घेता याव्यात, शिकवणीला पैसे देता यावेत म्हणून तिने जास्तीची कामे धरली. त्या कामांचा ताण तिच्या प्रकृतीवर पडला. झेपत नसतानाही ती चिकाटीने कामे करते. मी काळजी करतो तर फक्त अभ्यास जोरात कर चांगले मार्क मिळव आणि शिकून 'मोठ्ठा' हो; एवढेच म्हणते. मी खूप शिकावा, मोठ्ठा व्हावा हाच तिचा ध्यास आहे. ह्या ध्यासापायी कष्टाचे, श्रमाचे ओझे तिला वाटतच नाही असे ती सांगते. तुम्ही मला व्याकरण-निबंधाचा, शुद्धलेखनाचं मार्गदर्शन किती-उत्तम केलंत त्यामुळे मराठीत चांगले मार्क्स पडले याची आठवण ती काढते. तब्येत चांगली झाल्यावर ती भेटायला येईलच तुम्हाला.

...दिलीपला शिकून 'मोठ्ठा' करायची सावित्रीची व्यक्तिगत आकांक्षा माझ्या मनावर गहिरा ठसा उमटवून गेली. दिलीप हा तर सावित्रीच्या जीवनपटाचे आभाळ व्यापून राहिलेला. दिलीपला 'मोठ्ठा' करून दाखविणे. हे तिचे स्वप्न होते. त्यातच तिच्या आयुष्याची सार्थकता होती.

...दिलीप शिकावा म्हणून सावित्रीची तिच्या जीवापलीकडे चाललेली धडपड माझ्या मनाला अस्वस्थ करू लागली. उदास मनाने शाळेतून मी घरी आले. पायावर पाणी घेतले. पंखा लावला आणि कॉटवर आडवी झाले. डोक्यावर गरगरणाऱ्या पंख्यासारखेच माझे विचारचक्र सुरू झाले. दिलीपच्या उज्वल भविष्याचे किती आशादायक स्वप्न सावित्री पाहाते आहे. शिकला सवरलेला, कर्ता झालेला दिलीप हा तिचा ध्यास आहे. चांगली स्वप्ने हेच तर तिच्या जगण्याचे बळ आहे. आपला मुलगा शिकून 'मोठ्ठा' होईल या आशेवर ती कष्ट उपसते आहे. या गोड, मधुर स्वप्नांमुळे तर तिला कामाचे ओझे वाटत नाही.

...खरंच दिलीप तिच्या स्वप्नाची पूर्ती करेल का? तो वयाने मोठ्ठा होईल पण सावित्रीची 'शिकून मोठा हो' ही अपेक्षा तो पूर्ण करील का? सर्व विषयांत पास होऊन तो त्याचे शिक्षण पूर्ण करेल का? कदाचित तो एखाद्या इयत्तेत नापासही होईल, शिकून मोठा होण्याची त्याची बौद्धिक कुवत तरी किती आहे? सावित्रीच्या पदरात निराशा पडणार नाही ना? स्वप्न पाहाणारी कळी अपेक्षा भंगाच्या आघाताने अकाली मिटून जाणार नाही ना?

...माझ्या मनात विचारांचे काहूर माजले, मनाला प्रसन्न वाटावे म्हणून, मोकळ्या हवेत, मी एकटी फिरायला बाहेर निघाले. गावाच्या एका बाजूला आकाशपाळणे फिरत होते. क्षणात मी लहान झाले. मला माझे बालपण आठवले. आकाशपाळण्यात बसण्याचा मोह मी आवरला नाही. चक्क आकाशपाळण्यात जाऊन बसले आणि रोमांचकारी आनंदाचा अनुभव खूप दिवसांनी मला आला.

...मला वाटले, सुखदुःखाच्या आकाशपाळण्याचे झोके माणसाला कसे वरखाली-खालीवर नेत असतात. मनात विचार आला, सावित्री ही अशाच एका आकाशपाळण्यात बसली आहे, आणि तिच्या सुखाचा झोका वरच राहिला आहे. तो सुखाचा झोका आताच खाली आणून दुःखात तिला कशाला ढकलू? जीवनातील दाहक, कटू, सत्य वास्तवता तिला उद्या कदाचित अनुभवायला येईलही, मग आताच तिच्या स्वप्नांची राखरांगोळी कशाला करू? तिच्या वात्सल्यरसाच्या वाहाणाऱ्या झऱ्याला मी कशाला अडवू? तिचे भावविश्व कशाला उद्ध्वस्त करू? दिलीपला शिकून मोठा करणे हेच तर तिच्या जगण्याचे बळ आहे. नाही तरी पराभव आणि यश या गोष्टी सर्वस्वी आपल्या हातात नसतातच. तिच्या दिलीपला शिकून मोठ्ठा करण्याला आपण हातभार लावायचा; प्रयत्न करायचे, सावित्रीचे स्वप्न पूर्ण करण्याची देवाजवळ प्रार्थना करायची, एवढेच माझ्या हातात आहे.

...सध्या तरी सावित्रीचे 'स्वप्न' फुलवत ठेवण्याचा निश्चय मी केला. ...आणि माझं मन शांत झालं.

♦

## हसरे हितगुज



नवरा नवीन शर्ट घेऊन येतो

**बायको** : अहो, ऐका ना...
तुम्ही शर्ट आणताना आधी मला विचारत जा

**नवरा** : का? काय झालं?

**बायको** : हे असे पांढऱ्या पॅन्टवर पिवळा शर्ट नका घालत जाऊ.

**नवरा** : का? त्यात काय प्रॉब्लेम आहे?

**बायको** : अहो, परवा तुम्हाला पाहून माझी मैत्रिण म्हणाली की, तुझा वरणभात आला बघ.

आरोग्यं धन संपदा

# उन्हाळ्यातील व्यायाम

सतत तहान लागणं ही या मोसमातील अगदी सामान्य समस्या आहे. मेहनतीची कामं आणि घामामुळे पाण्याची सातत्याने लागणारी गरज भागली पाहिजे. दिवसाला साधारणतः १० ते १२ ग्लास पाण्याची आवश्यकता उकाड्यामुळे भासते. नियमित व्यायाम करत असाल तर, व्यायामाच्या एक तास आधी एक-दोन ग्लास, व्यायामादरम्यान दर पंधरा मिनिटांनी अर्धा ग्लास आणि व्यायामानंतर अर्ध्या तासाने दोन ग्लास पाण्याचं सेवन करावं.

पोहणं : उन्हाळा हा पाण्याशी निगडीत व्यायामासाठी उत्तम काळ आहे. सांधे आणि हाडांवर फारसा ताण न येता करता येण्याजोगा उत्तम व्यायाम म्हणजे पोहणं.



सायकल चालवणं : सांध्यांना त्रास न होता करता येईल असा व्यायामाचा आणखी एक उत्तम पर्याय म्हणजे, सायकल चालवणं. त्यामुळे हा पर्यायही निश्चितच फायद्याचा आहे.

चालणं : जॉगिंग ट्रॅक्स, रस्ते, बीच असे अनेक पर्याय चालण्यासाठी उपलब्ध आहेत. बाहेर मोकळ्या वातावरणात चालायला आवडत नसेल, तर ट्रेडमिलसारख्या पर्यायांचादेखील तुम्ही विचार करू शकता.

प्राणायाम आणि योग : योगासने हा व्यायामासाठी सर्वोत्तम पर्याय म्हणता येईल. शरीर आणि मन या दोन्हीला आराम देण्याची क्षमता योगासनांमध्ये आहे. त्याला प्राणायामाची योग्य साथ लाभल्यास, उन्हाळ्यात हा व्यायाम सर्वोत्तनच ठरतो.



उन्हाचा तडाखा असताना व्यायाम करणं टाळा. त्याने उष्माघात, चक्कर येणं यासारखे त्रास संभवतात. या दिवसात थकवा येणं तर अगदीच साहजिक आहे. घराबाहेर करण्याचे व्यायाम निवडत असाल तर, सकाळी लवकर अथवा सायंकाळची वेळ व्यायामासाठी निवडावी. शक्यतो वातानुकूलित जिममध्ये व्यायाम करणं अधिक श्रेयस्कर असतं.

---

# वाचकांचा पत्रव्यवहार

संपादिका,

आदरणीय, डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, यांसी स.न.वि.वि.

आपणास खूपच दिवसांतून पत्र पाठवीत आहे. क्षमस्व. मार्च २०१९चा अंक खूपच वाचनीय, आदर्श व मनाला भावणारा आहे का त्याचे एकच कारण लेख १. डोळस जबाबदारी आदिती अतुल मराठे. कथा, गोष्ट, कहाणी नसून वास्तव काय आहे व पालक व पाल्य यांचे अतुट प्रेम नाते हा प्रवास वाचून अंगावर काटा आला. एकच मोरयाला प्रार्थना, त्या मराठे कुटुंबाला त्याने भरपूर सुखद आयुष्य द्यावे. असे पालक जगात एकमेव म्हणावे लागेल. त्या कुटुंबाला त्रिवार धन्यवाद. नमस्कार

२. ज्ञानेश्वर माऊलींवरील लेख पाकनिपुण ज्ञानेश्वर - आपला स्वतःचा - त्यांच्या ओव्या व अर्थ त्या प्रत्येक अर्थातून ज्ञानेश्वर प्रत्यक्ष आपण साक्षात दर्शन दिलेच आहे. आपणास धन्यवाद.

३. काकूचे पत्र - एक संवेदनाशील पत्र. एखादी गोष्ट आपण ठरवली की होते त्याचे प्रत्यंतर पत्रातून होते. खूपच छान लेख.

सुमेधाताई खूप लिहावेसे वाटते पण अक्षरांची ओळख तुम्हाला होणार नाही म्हणून ठीक वाटत नाही असो. तसे प्रयत्न करू. वेळ मिळायला हवा. असो.

आपल्या कार्यकारणी मंडळातील सर्व सदस्यांना सा.न. मराठे परिवाराला सा.न. कळावे. अक्षरे ओळखून घ्यावीत.

आपला

**भास्कर दत्तात्रय मराठे**, मिरज, (जि. सांगली)

---

दि. १५.३.२०१९

श्री. माननीय संपादिका 'हितगुज'
यांसी स.न.

'हितगुज'चा मार्च २०१९चा अंक मिळाला. श्री. श्रीनिवास अनंत आणि श्री. संजय रामचंद्र यांचे लेख अतिशय उत्तम आहेत.

आपला विश्वासू

**कालिदास मराठे** (पृ.५४३), *फोंडा-गोवा (०८३२-२३१३८०५)*

### सुविचार

*जोपर्यंत चांगले शिक्षण घेणे म्हणजे चांगली नोकरी लागणे ही संकल्पना पालक आणि विद्यार्थ्यांच्या डोक्यातून निघत नाही तोपर्यंत समाजात नोकरच जन्माला येतील, मालक नाही.*

**- जॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम**

# वाट दवानं भिजून गेली...

सुप्रसिद्ध कवयित्री शांता शेळके यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी पुणे जिल्ह्यातील इंदापूर येथे झाला. त्यांनी नागपुरातील हिस्लॉप कॉलेज, मुंबईतील रुईया आणि एमडी कॉलेजमध्ये मराठीच्या अध्यापिका म्हणून काम केलं. अनुवादक, समीक्षा-स्तंभ लेखिका, वृत्तपत्र सहसंपादिका म्हणूनही शांता शेळके यांनी साहित्यात मोलाची भर घातली आहे. शांताबाई शेळके यांनी डॉक्टर वसंत अवसरे, या टोपण नावानं देखील गीतं लिहिली. आळंदी येथे १९९६ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची काही गाजलेली गाणी म्हणजे ‘अजब सोहळा’, ‘असेन मी नसेन मी’, ‘जिवलग राहिले रे सूर घर माझे’, ‘गणराज रंगी नाचतो’, ‘काटा रुते कुणाला’ इ. अशा या प्रतिभासंपन्न लेखिका, गीतकार, कवयित्री शांताबाई शेळके यांचा मृत्यू ६ जून २००२ रोजी झाला. मला त्यांचं मनापासून आवडलेले गीत म्हणजे ‘वाट दवानं भिजून गेली’ हे होय. हृदयनाथ मंगेशकर यांच्या अतिशय सुरेल संगीताला, लता मंगेशकर यांनी आपल्या सुमधुर आवाजानं सुरेख न्याय दिला आहे. हे गीत ‘पवनाकाठचा धोंडी’ या चित्रपटातील आहे. या चित्रपटाचे निर्माते आहे, उषा मंगेशकर आणि विनायक ठाकूर. हा चित्रपट १९६६ साली प्रदर्शित झाला. त्या गीतातील ओळी पुढीलप्रमाणे...

वाट दवानं भिजून गेली
उन्ह दारात सोन्याची झाली
मायभवानी पावनी आली
पावनेर ग मायेला करू
ओटी आईची मोत्यानं भरू

माय अंबिका माय भवानी
रूपदेखणी गुणाची खाण
शंभूराजाची लाडकी राणी
माझी पायरी लागे उतरू
ओटी आईची मोत्यानं भरू

सुखे नांदते संसारी बाई
न्हाई मागणं आणिक काई
काळी पोत हि जन्माची देई
तूच सांभाळ आई लेकरू
ओटी आईची मोत्यानं भरू!

*म.टा. सोमवार ६ मे २०१९ वरून साभार*

# वसईत पहिले कलादालन सुरू

## ज्येष्ठ चित्रकार अरुण मराठे यांचा उपक्रम; शहरातील अनेक चित्रकार, उदयोन्मुख कलावंतांना लाभ

*बोरिवली ते पालघर परिसरांत एकही कलादालन नसल्याची खंत असल्यामुळे हे कलादालन सुरू केले आहे. वसई-विरारमध्ये अनेक होतकरू, उदयोन्मुख चित्रकार आणि कलावंत आहेत. या सर्वांना या कलादालनाचा लाभ घेता येईल.*

**- अरुण मराठे, ज्येष्ठ चित्रकार**

वसईतील कलाप्रेमींसाठी प्रथमच कलादालन (आर्ट गॅलरी) सुरू करण्यात आले आहे. वसईच्या पारनाका येथे हे कलादालन सुरू करण्यात आले असून पालघर ते बोरिवली दरम्यानच हे एकमेव कलादालन आहे.

ज्येष्ठ चित्रकार अरुण मराठे यांनी हे कलादालन उभारले आहे. ‘मराठे आर्ट गॅलरी’ नावाच्या या कलादालनात त्यांनी साकारलेल्या जलरंग चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या पहिल्याच प्रदर्शनात कलारसिकांना विविध चित्रे पाहायला मिळणार आहेत. हे प्रदर्शन रसिकांसाठी दिवसभर खुले राहणार आहे.

जुन्या वसईला सांस्कृतिक वारसा लाभल्यामुळे मराठे यांनी आपल्या कला प्रदर्शनात तसे चित्रस्वरूप वर्णन केले आहे.

वसई परिसरातील अनेक चित्रकार, शिल्पकार, कलावंत या कलादालनाचा लाभ घेऊ शकतात. असे मराठे यांनी सांगितले आहे.



ARUN M. MARATHE
Retd. Principal, Model Art Institute, Dadar

MARATHE ART GALLERY

*Available for*
*Artist, Sculptor & Photographer*

Contact for Gallery
'Marathe Niwas', Parnaka, Vasai (W) - 401201.
Tel. : (0250) **2309926**, Mob. : **9421628608.**

# राजापूर आणि गंगालहरी

• नंदकुमार मराठे (पृ.२१९) भ्रमणध्वनी : ९९६०६३६०४०

**भा**रतातील ७ पवित्र नद्यांपैकी गंगेला पहिला मान जातो. या गंगेला 'विष्णुपदी' व 'त्रिपथगा' या नावानेही संबोधतात. भगिरथ राजाने गंगेला हिमालयातून भूतलावर आणले म्हणून तिला 'भागीरथी' म्हणूनही ओळखतात.

गंगेला भूतलावर आणण्यासाठी सगर राजाचा नातू अंशमान व अंशमानाचा पुत्र राजा दिलीप यांनी प्रयत्न केले परंतु राजा दिलीपाचा पुत्र राजा भगिरथ यालाच हे शक्य झाले. राजा भगिरथाच्या अथक तपश्चर्येतून गंगा भूतलावर आली परंतु तिचा प्रवाह अतिप्रचंड वेगवान असल्याने भगिरथाच्या प्रार्थनेमुळे भगवान शंकराने तिला आपल्या मस्तकी जेटमध्ये स्रोत सामावून घेतला अन्यथा गंगा थेट पाताळात गेली असती. भगवान शंकराच्या जटेतून सप्तधारा मार्गाने ती पृथ्वीतलावर अवतरली. भगिरथाने ही नदी कपीलमुनींच्या आश्रमापर्यंत आणली. गंगेबरोबर जन्हुऋषींनी अडवलेला गंगामार्ग ऋषींच्या कर्णकुंडलातून पुढे आल्याचे वायूपुराणात उल्लेख आढळतात.

गंगेच्या पृथ्वीवरील आगमनाबाबत वैशाख शुद्ध तृतीया, कार्तिक पौर्णिमा, ज्येष्ठ शुद्ध दशमी असे तिथीबाबत उल्लेख पुराणात आढळतात. त्यावेळी भौमवासरे म्हणजे मंगळवार व हस्तनक्षत्र योग होता.

गंगा आणि गौरी या हिमालयाच्या कन्या. गंगा ज्येष्ठ व गौरी कनिष्ठ कन्या. गंगा ही लहरी व गर्विष्ठ कन्या होती. जगप्रलयावेळीही ती वहातच होती. गंगा आणि गौरी दोघींनी भगवान शंकराला वरले होते. त्यामुळे दोघीत सवतीमत्सर होता.

गंगा पूर्व दिशेने चैत्रबनाकडे वाहिली. त्या प्रवाहाला 'सीता' म्हणतात. सुमेरू पर्वताच्या दक्षिणेकडून गंधमादन पर्वताकडे जाणाऱ्या प्रवाहाला 'गौतमी' म्हणतात. उत्तरेकडे वाहणाऱ्या प्रवाहाला 'भगिरथी' म्हणतात. गंगानदी वटोदका, नलिनी, सरस्वती, जंबुनदी, सीता, गंगा व सिंधु अशा नावाने प्रवाहीत होऊन सागराला मिळाली. त्या पवित्र तीर्थक्षेत्राला 'गंगासागर' असे संबोधतात. या बाबतचे उल्लेख मार्कंडेय पुराण, पद्मपुराणात आढळतात.

विष्णुपुराणात तिच्या चार प्रवाहात सीता, अलकनंदा, चक्षु आणि भद्रा अशी नावे आहेत. गंगेच्या काठावर राजा भरताने अश्वमेध यज्ञ केला. युधिष्ठीराने राजसूय यज्ञ केला. द्रौपदीच्या पाच मुलांचे और्ध्वदेहीक गंगा किनाऱ्यावर झाले. राजा परिक्षीताने गंगेच्या किनाऱ्यावर 'प्रायोपवेशन' केले. अग्नीदेवाच्या अनुज्ञेवरून रूद्राचे बीज धारण करणेसाठी गंगेने स्कंद (कुमाराला) जन्म दिला. ब्रह्मांड पुराणात यांचे उल्लेख आढळतात.

गंगेवर साडेतीन कोटी तीर्थक्षेत्र आहेत. गंगा ही महासागराची भार्या आहे. ती वेदाची उजवी बाजू आहे.

गंगेचा उगम टेहरी गढवालमध्ये समुद्रसपाटीपासून १३,८०० हात उंच गंगोत्रीजवळ एका हिमनगामध्ये झाला. पौराणिक उल्लेखात त्याला 'गोमुखी' म्हणतात. यामुन पर्वतापासून नंदादेवीपर्यंत गंगेचे प्रसवन्नक्षेत्र आहे. मंदरगिरी, यामुन, बंदसूछ, द्रोणागिरी, धौलगंगा, विष्णुप्रयाग, नंदप्रभाग, कर्णप्रयाग, रूद्रप्रयाग, गंगोत्री, ऋषीकेश, मिरज, रोहिलखंड, पुरूकाबाद, अवध, प्रयाग, मिर्झापुर, वाराणशी, बलिया, पश्चिम बंगाल, अलमोडा, राणीखेत, नैनीताल, मध्यप्रदेश, अंतर्वेदी वगैरे भौगोलिक परिसर या प्रवाहात आढळतो. वाटेत शौणनदी, गंडकी, कोशी गाग्रा, पद्मा, ब्रह्मपुत्रा तिला येऊन येऊन मिळतात व तिचे पात्र महाप्रवण होते. पुढे या विशाल पात्रात मेघना नदी येऊन बंगालच्या उपसागरात ती आत्मार्पण करते.

गंगानदी उगमापासून ते आत्मसमर्पणापर्यंत १५५० मैलांचा प्रभाग यात समाविष्ट आहे. हुगळी, मारला, रायमंगल, मालंच व हरिघाट ही तिची समुद्राला मिळणारी इतर मुखकमले आहेत.

ऋग्वेदात गंगेचा दोन वेळा उल्लेख आहे. शतपथ ब्राह्मण, जैमिनीय ब्राह्मण व तैत्तिरीय अरण्यक या ग्रंथात गंगेचे संदर्भ आढळतात. बृहतनारदीय, पद्म, विष्णु, शिव, मत्स्य, देवी भागवत, मार्कंडेय पुराण व वामन या पुराणात गंगेचे उल्लेख आहेत.

अशी ही गंगा रत्नागिरी जिल्ह्यात राजापूर तालुक्यात उन्हाळे गावी १७व्या शतकापासून अवतरते, असे ऐतिहासिक उल्लेख आढळतात.

राजापूरातील दोन नद्यांच्या सुंदर संगमांवर रत्नागिरीच्या पूर्वेला वसलेले हे गाव. रस्त्याजवळ छोट्या परिसरावर वसलेले उन्हवरे हे गाव त्याला 'उन्हाळे' असेही संबोधतात. या परिसरांत गंगामाईचे एक कुंड, परिसरात विविध वृक्षवल्ली आणि इतर १३ कुंडे लहान-मोठ्या आकाराची आहेत. गंगा आली की कुंड पाण्याने भरलेली असतात.

मूळ काशीकुंड व इतर सूर्यकुंड, चंद्रकुंड, पृथ्वीकुंड वगैरे नावांनी प्रसिद्ध आहेत. प्रत्येक कुंडातील पाण्याची पातळी भिन्न व तापमानही भिन्न असल्याने ही भूगर्भातील विशिष्ट तापमानाची वैज्ञानिक प्रक्रिया असावी, असे वाटते.

या पाण्याच्या पृथःकरणावरून हे पाणी गंधकमिश्रीत असते. गंगा या कुंडातून येण्यापूर्वी भाताचा कोंडा कुंडातून बाहेर पडतो.

एका वृद्ध भक्ताला पंढरपूरच्या चंद्रभागेच्या स्नानाला जाता आले नाही. त्याने प्रार्थना करताच गंगा राजापूरला त्या वृद्धाच्या शेतात अवतरली, अशी दंतकथा सांगितली जाते.

तशी ही गंगा येणे आणि तिने जाणे याबाबत काही निश्‍चित अंदाज देता येत नाहीत. सरासरी दर तीन वर्षांनी गंगा राजापूरात अवतरते. पावसाचे पाणी जमिनीत जाते. साठले व ते जास्त झाले की, भूगर्भातून वर येते, असे दिसते. परंतू हे पाणी इतक्या वेगात खाली जाते की, गंगा आली म्हणेपर्यंत अनेक वेळा लुप्तही होते. निसर्गाची ही देणगी आहे.

गंगेचे आगमन मात्र ऐतिहासिक आहे. १७व्या शतकाच्या उत्तरार्धात १६६१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी गंगा क्षेत्रावर भेट दिली. त्यावेळी राजपुरोहित म्हणून रानडे कुटुंबियांना मान दिला गेला. पुढे १६६४ मध्ये गागा भट्ट येऊन गेले. त्यावेळी तेथील स्थानिक वैचारिक मतभेद मिटविण्यासाठी गागाभट्टांनी सामंजस्य केल्याचे इतिहास सांगतो. १७८९ मध्ये कवीवर्य मोरोपंत हे त्यांच्या वयाच्या ६०व्या वर्षी राजापूरात गंगेच्या स्नानार्थ आले होते.

पुढे १८व्या शतकाच्या प्रारंभी इंग्रज व फ्रेंच अधिकाऱ्यांनी गंगाक्षेत्रावर भेटी दिल्याचे ऐतिहासिक उल्लेख सापडतात. १९१८ मध्ये गंगा आली पण ती गोमुखातून वाहू शकली नाही. पुढे १८ वर्षे गंगा आलीच नाही. १९३६च्या जुलै महिन्यात गंगा आली. ती फक्त १२ दिवसच राहिली. १९३८ मध्ये २४ दिवस, १९४२ मध्ये ४५ दिवस पुढे दर चार वर्षांनी तिचे आगमन होत गेले. १९६० च्या मार्चमध्ये जानेवारी १९६३ व १९६५ च्या सहा मार्चला आगमन झाले. त्यानंतर पुढे १९७७ पर्यंत परत १२ वर्षांच्या एका तपानंतर तिचे आगमन झाले होते.

गंगा कधीही येते व कधीही जाते. एकोणिसाव्या शतकातील तिचे आगमन १९८३ मार्च ६५ दिवस, जून १८८५-१७ दिवस, डिसेंबर १८८६-४५ दिवस, ऑक्टोबप १८८९-१८ दिवस, डिसेंबर १८९०-४५ दिवस, ऑगस्ट १८९३-१६ दिवस, जुलै १८९५-१८ दिवस, जून १८९७-२२ दिवस, एप्रिल १८८९-४५ दिवस, १९०१ मार्च ४५ दिवस, १९०२ एप्रिल - ५२ दिवस, १९०५ एप्रिल - ६६ दिवस, १९०८ सप्टेंबर-५१ दिवस, १९१३ मे ३६ दिवस, १९१५ जून - २९ दिवस असे तिचे ऐतिहासिक वास्तव्य होते.

१९१८ नंतर जास्तीत जास्त ६६ दिवस १९०५ मध्ये व कमीत कमी १२ दिवस १९३८ मध्ये ती राहिली आहे. १९८५ साली ती सव्वा वर्षांनी प्रकट झाली. २००१ साली गुजरात भूकंपानंतर तिचे आगमन झाले होते. १०.०२.११ ते ०५.०६.११ पर्यंतच्या तिच्या प्रकटीकरणानंतर दि. ११.०४.२०१२ ला ती पुन्हा प्रकट झाली.

गंगापुत्रांना गंगेच्या मूळ उगमासंदर्भात विचारणा केली तर एका मोठ्या वटवृक्षाचा आधार दिला जातो. गंगा तशी लहरी आहे. ती आल्याची वार्ता समजताच परिसरात गंगापुत्र व इतर अनेकांची गर्दी जमून यात्रा सुरू होते.


या गंगा स्थानकाभोवती जुनाट चिरेबंदी दरवाजा आहे. तटबंदी, फरसबंदी, पायऱ्या आहेत. अद्याप या गंगा किनारी गंगेची एखादी मूर्ती बनवावी व मंदिराच्या रिकाम्या जागेत एका छायाचित्राची पूजा होते त्याऐवजी गंगेच्या मूर्तीची स्थापना व्हावी, असे वयोवृद्ध पुजारी रानडे, सप्रे, घाटे या गंगापुत्रांना वाटते. गंगेच्या उगमाबाबत पाण्यातील गंधक मिश्रीत वासाबद्दल विविध तापमानाबाबत विज्ञानप्रेमींनी गंगेचा शोध घेऊन उलगडा करण्याची आवश्यकता आहे.

♦






# साभार पोच




**मनस्वी (विक्रम सावरकर चरित्रग्रंथ)**
**लेखिका :** अनुराधा वसंत खोत
**प्रकाशक :** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, दादर मुंबई ४०००१८
**द्वितीय आवृत्ती :** फेब्रुवारी २०१९
**संकल्पना :** पृथ्वीराज विक्रम सावरकर (९०९६१२८०१६)
**समन्वयक:** अशोक शिंदे (९८२१३७४६२६)
**मूल्य ४००/– रुपये • पृष्ठ संख्या ५५०**




**अभिनव भारत**
**लेखक :** रघुनाथ प्रभाकर महाबळ, नाशिक
**प्रकाशक :** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकर, दादर मुंबई ४०००२८
दूरध्वनी (०२२) २४४६५८७७
भ्रमणध्वनी ९४०४८०४०३२
**स्वागत मूल्य** १०० रुपये
**पृष्ठे** १३४




**ही अेक माझी जीवनगाथा**
**लेखिका :** सौ. नीता (ज्योत्सना) पिटकर
**खाजगी वितरणासाठी**




**वाचनाविषयी सर्व काही**
**लेखक :** कालिदास बा. मराठे
कजा कजा मरू प्रकाशन, गरवारे बालभवन पुणे फोन २४४४२१०९
**प्रथमावृत्ती :** १ मे २०१९
**वितरण व्यवस्था :** नवचैतन्य प्रकाशन, बोरिवली (०२२-२८६४५२१२)
श्री. शरद मराठे, सौ. सुप्रिया मराठे
**मूल्य** २०० रु.

**BOOK POST**

If undelivered, Please return to

संपादिका : **डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१.**

त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५
या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९
इ-मेल : hitguj@marathepratishthan.org • वेबसाईट : www.marathepratishthan.org